
## मुख्यमंत्री शिंदे समर्थक आमदार मुंबईत दाखल



**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक बंडखोर आमदार अखेर ११ दिवसांनंतर शनिवारी (दि. २) मुंबईत दाखल झाले. गोव्यातील विमानतळावरून या आमदारांच्या विमानाचे उड्डाण झाले होते. रात्री ८.३०च्या सुमारास ते मुंबई विमानतळावर पोहचले. तिथे त्यांचे स्वागत करण्यात आले. यामध्ये शिवसेनेचे ३९ आणि १० अपक्ष आमदारांचा समावेश आहे. या आमदारांच्या बंडखोरीमुळे महाविकास आघाडी सरकार कोसळले. शिवसेनेच्या आमदारांनी बंडखोरी केल्याने त्यांच्या विरोधात शिवसैनिकांनी आंदोलने केली. त्यानंतर त्यांच्या सुरक्षेचा मुद्दाही उपस्थित झाला. त्यामुळे विमानतळावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यानंतर चोख पोलीस बंदोबस्तात या सर्व आमदारांना एका बसने ताज हॉटेलपर्यंत नेण्यात आले.


रविवार, ३ जुलै २०२२ ◆ वर्ष १४ ◆ अंक ३४६

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## अंतरंग


'आमचे सरकार उर्वरित कार्यकाळ पूर्ण करेल'/२

रविवारनिमित्त विविध वाचनीय सदरे/४, ६

पंतनंतर जडेजाचे धडाकेबाज शतक; भारत चारशेपार/८




# विधानसभा अध्यक्षपदाची आज निवडणूक

## विशेष अधिवेशनात पहिल्याच दिवशी सत्ताधारी-विरोधकांमध्ये थेट लढत

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील नव्या सरकारला बहुमत सिद्ध करण्यासाठी बोलाविण्यात आलेल्या दोनदिवसीय विशेष अधिवेशनाला रविवार (दि. ३)पासून प्रारंभ होत आहे. या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक होत असून भाजप युतीचे ॲड. राहुल नार्वेकर आणि महाविकास आघाडीचे राजन साळवी यांच्यात लढत आहे.

नाना पटोले यांनी राजीनामा दिल्यानंतर विधानसभा अध्यक्षपद रिक्त झाले. तेव्हापासून विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळच अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडत होते. आता महाविकास आघाडी सरकार पडून नवे सरकार सत्तेवर आल्यानंतर ३ जुलै रोजी विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक जाहीर करण्यात आली आहे, तर दुसऱ्या दिवशी बहुमत चाचणी होणार आहे.

विधानसभा अध्यक्षपदासाठी भाजपकडून कुलाब्याचे आमदार ॲड. राहुल नार्वेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे, तर त्यांच्याविरुद्ध शिवसेनेचे राजापूरचे आमदार राजन साळवी यांनी अर्ज दाखल केला आहे. एकीकडे भाजप मित्रपक्ष आणि दुसरीकडे महाविकास आघाडी यांच्याकडील आमदारांचे संख्याबळ पाहता या निवडणुकीत ॲड. नार्वेकर यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

# पनवेल महापालिकेचे महत्त्वपूर्ण पाऊल

## पहिल्या इंग्रजी माध्यम शाळेचे उद्घाटन; मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : प्रतिनिधी**



पनवेल महापालिकेच्या लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात इंग्रजी माध्यमाच्या ज्युनिअर केजी वर्गाचे उद्घाटन शनिवारी (दि. २) उपमहापौर सीताताई पाटील यांच्या हस्ते सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, नगरसेविका दर्शना भोईर, शिक्षणाधिकारी बाबासाहेब चिमणे यांच्या उपस्थितीत झाले.

मुलांच्या स्वागतासाठी शाळेमध्ये सर्वत्र रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या, फुगे लावण्यात आले होते. मुलांना गुलाबाचे फूल आणि चॉकलेट्स देऊन मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले तसेच त्यांचे वर्गात येताना औक्षण करण्यात आले. या सर्व वातावरणाने चिमुकली मुले भारावून गेली होती. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या वेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याचप्रमाणे शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हजर होते.

या वेळी मुलांना दप्तर, वह्या, कंपास बॉक्स देण्यात आले. लवकरच त्यांना बूट आणि गणवेशही देण्यात येणार आहे. या वर्गामध्ये डिजिटल ब्लॅकबोर्डची सोय करण्यात आली आहे. या शाळेत प्रवेश घेण्यासाठी ५० अर्ज आले होते. यातील ४० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.

> शिक्षण क्षेत्रातही पनवेल महापालिकेचे नाव आदराने घेतले जावे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आम्हाला नागरिकांच्या सहकार्याची गरज आहे.
> **-परेश ठाकूर, सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका**

उद्घाटन समारंभात पालकांना संबोधित करताना आयुक्त गणेश देशमुख म्हणाले की, सर्वसामान्य कुटूंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घेण्यासाठी पनवेल महापालिका प्रयत्नशील असून त्याचाच एक भाग म्हणजे ही इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्यात आली आहे. येथून पुढेही इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या विस्तारासाठी पालिका प्रोत्साहन देणार आहे.





**पनवेल : स्वानंद सुख निवासी चांगू काना ठाकूर यांच्या १९व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस सुपूत्र माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि नातू भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिवाजीनगर येथे अभिवादन केले.** (छाया : अमित जाधव, योगेश पाटील)


**अधिक छायाचित्रे पान ३ वर..**


## निवडक

### भाजप राष्ट्रीय कार्यकारिणीची हैदराबादमध्ये बैठक सुरू

**नवी दिल्ली :** भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची दोनदिवसीय बैठक हैदराबाद येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि भाजपचे १९ मुख्यमंत्री सहभागी होणार आहेत. 'मिशन दक्षिण' अजेंड्याखाली भाजप दक्षिण भागातील अधिकाधिक मतदारांना आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न करणार आहे. पुढील वर्षी तेलंगणामध्ये निवडणुका होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

### मणिपूर भूस्खलनातील मृतांचा आकडा २४वर

**इम्फाळ :** मणिपूरच्या नोनी जिल्ह्यात झालेल्या भूस्खलन दुर्घटनेत आतापर्यंत २४ जणांचे मृतदेह सापडले आहेत. जिरीबामला इम्फाळशी जोडणाऱ्या रेल्वेमार्गाचे काम सुरू असून त्यासाठी तुपूल यार्ड येथे १०७ जवानांची नियुक्ती करण्यात आली होती. तेथे मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले.

# किल्ले रायगडच्या पायथ्याजवळ असलेल्या गावात जमिनीला भेगा

## ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

ऐतिहासिक किल्ले रायगडच्या पायथ्याजवळ असलेल्या बावले गावात जमिनीला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

महाड, पोलादपूर तालुक्यात २००५मध्ये झालेल्या अतिवृष्टीत अनेक ठिकाणी भूस्खलन झाले होते. त्यानंतर शासनाकडून दोन्ही तालुक्यांतील डोंगराळ परिसर आणि जमिनीचे भूवैज्ञानिकांकडून सर्वेक्षण करण्यात आले, पण जे उपाय योजणे आवश्यक होते त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. किल्ले रायगड परिसरात असलेली अनेक गावे डोंगरउतारावर आहेत. कावले, बावले, सांदोशी, करमर, आमडोशी, पुनाडे, नेवाळेवाडी, हिरकणी आडी या पायथ्याजवळ असलेल्या गावांना धोका निर्माण झालेला आहे.

बावले गावाची लोकसंख्या सुमारे २०० असून या गावातील शेवंताबाई कडू यांच्या ओसाड जमिनीला मोठ्या प्रमाणात तडे गेल्याचे शुक्रवारी आढळून आले. त्याच गावातील चंद्रकांत महाडिक हे रानात गेले असता जमिनीच्या भेगा प्रत्यक्ष पाहून तेही भयभीत झाले. **(पान २ वर..)**

# उमेश कोल्हे यांची हत्या नुपूर शर्मांच्या समर्थनातूनच!

**अमरावती : प्रतिनिधी**

अमरावती येथील उमेश कोल्हे यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी मोठा खुलासा केला आहे. ही हत्या नुपूर शर्मांची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल केल्यानेच झाल्याची माहिती पोलीस उपायुक्त विक्रम साळी यांनी दिली. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्रालयाने या हत्या प्रकरणाची गंभीर दखल घेत तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सोपविला आहे.

पोलीस उपायुक्त विक्रम साळी म्हणाले, या घटनेचा सर्व बाजूंनी तपास केला. त्यात प्रथमदर्शी कोल्हे यांनी नुपूर शर्मा यांच्या समर्थनार्थ सोशल मीडियावर जी पोस्ट केली त्याच संबंधाने हा गुन्हा घडल्याचे निष्पन्न झाले आहे. या खून प्रकरणात आतापर्यंत सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयाने ४ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# पेणमध्ये संमतीशिवाय केला महिलेचा गर्भपात

**डॉक्टरसह सासरच्या मंडळींना अटक; पोलीस कोठडी**

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वरेडी येथे राहणाऱ्या एका गर्भवती महिलेचा तिच्या संमतीशिवाय गर्भपात केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी डॉक्टर संबंधित महिलेच्या सासरच्या मंडळींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींना पेण न्यायालयात हजर केले असता ५ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

फिर्यादी महिलेचा यंदाच्या वर्षीच विवाह झाला होता. काही महिन्यांनी ती गरोदर राहिल्याचे सासरच्यांना कळले, मात्र या महिलेला तिच्या संमतीशिवाय पती रोशन अरुण कोळी, सासू सुभद्रा कोळी, नणंद या सर्वांनी संगनमत करून उपचार करण्यास नेतो म्हणून डॉ. शेखर धुमाळ यांचेकडे नेले. वेळोवेळी उपचाराद्वारे डॉ. धुमाळ यांनी फिर्यादीचा १६ आठवड्यांचा गर्भ नष्ट करून गर्भपात केला. यामुळे आपल्या शरीरावर विपरीत परिणाम होऊन अवयवांना गंभीर इजा झाल्याचेही महिलेने तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी डॉ. धुमाळ यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच नवरा लग्नानंतर मारझोड करून व उपाशी ठेवून क्रूरतेची वागणूक देत होता या तक्रारीवरून पती रोशन अरुण कोळी, सासू सुभद्रा कोळी यांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणी आणखी दोन आरोपी नणंद देवता विनायक भोईर व नणंदेचा पती विनायक भोईर यांच्याविरोधातही दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# वलगणीच्या मासळीची लज्जतच काही न्यारी...!

## मत्स्यप्रेमी खवय्यांची चिवणीला पसंती



**उरण : वार्ताहर**

दडी मारलेल्या पावसाने अखेर दमदार सुरुवात केल्याने उरण तालुक्यात खाडीकिनारी चिवणी मासे पकडण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. या माशांची गाभोळी (अंडी) खाण्याची मजा काही औरच असते. त्यामुळे मासांहारी खवय्यांची मोठी पसंती या माशांना मिळत असल्याचे दिसून येत आहे.

पावसाळा सुरू झाला की उरण तालुक्याच्या पूर्व भागात वलगणीचे मासे मोठ्या प्रमाणात मिळतात. सुरुवातीच्या पावसात हे मासे आपली अंडी सोडण्यासाठी समुद्रातून नदी, नाले, शेतीत येतात. या वर्षी पाऊस उशिरा पडल्याने मत्स्यखवय्यांना चिवण्यांची गाभोळी खायला थोडा विलंब झाला, पण आता मासळी बाजारात चिवणी माशांची आवक वाढली आहे. ग्राहकदेखील या माशांवर तुटून पडत आहेत. १० माशांचा वाटा गेल्या वर्षी शंभर रुपयाला मिळायचा. या वर्षी शंभर रुपयाला चार ते पाच मासेच मिळत आहेत.

एकेकाळी उरण तालुका म्हणजे मासळीचे आगर म्हणून ओळखला जात असे, मात्र औद्योगिकीकरण, भूसंपादन, पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत बंद होणे यांसारख्या कारणामुळे येथील मासळी मिळण्याचे प्रमाण फार कमी झाले आहे. तरीदेखील मिळेल ती मच्छी पकडून बाजारात विकली जात आहे. यामध्ये पावसाच्या सुरुवातीला मिळणाऱ्या वळगणी खरेदीकडे खवय्यांचा अधिक कल दिसून येत आहे.

# वरुणराजाच्या आगमनाने बळीराजा सुखावला!

## शेतकरी कामांमध्ये गर्क



**उरण : प्रतिनिधी**

यंदा सुरुवातीला नाममात्र हजेरी लावून नंतर मात्र दडी मारलेल्या पावसाने मागील दोन दिवसांपासून पुन्हा आपली हजेरी लावली आहे. त्यामुळे बळीराजा सुखावला असून महिनाभरापासून खोळंबलेल्या शेतीच्या कामांना वेग आला आहे.

हवामान विभागाने जूनच्या पहिल्याच आठवड्यात जोरदार पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तविला होता, मात्र हा अंदाज साफ चुकला. त्यानंतर दोन-चार दिवस पावसाच्या हलक्या सरी, तर कुठे रिमझिम पाऊस बरसला होता. त्यामुळे रायगडातील शेतकऱ्यांनी शेतीच्या कामांना सुरुवात केली होती. खुरपणी, नांगरणी करून भात बियाण्यांची पेरणी केली होती, मात्र मागील १५ ते २० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पेरण्यात आलेली भात बियाणी करपण्यास सुरुवात झाली. त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले होते.

अखेर पावसाने गुरुवारपासून जोरदार हजेरी लावली. दोन दिवस पडलेल्या पावसाने शेतात पाणी साचले आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी नांगरणीच्या कामात मग्न झाले आहेत, तर अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी पावसामुळे खोळंबलेल्या शेतीच्या कामांना सुरुवात केली आहे. उशिराने का होईना पावसाच्या आगमनाने शेतकरी सुखावला असल्याचे दिसून येत आहे.

# अग्निपथ योजनेच्या माहितीसाठी संपर्क साधावा; भाजपचे आवाहन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारच्या माध्यमातून देशांतील युवांसाठी सैन्यदलांमध्ये भरतीसाठी अग्निपथ योजना अंमलात आली असून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन भाजपच्या वतीने करण्यात आले आहे.

अग्निपथ योजनेसाठी पात्रता वय १७.५ ते २१ असून पहिल्या वर्षी ४६ हजार जागा भरण्यात येणार आहेत. याचा सेवा कालावधी चार वर्षे (प्रशिक्षण काळासह) असून वेतन दरमहा ३० ते ४० हजार हजार रुपये (लागू असल्यास स्वतंत्र भत्ता) तसेच दरवर्षी वेतनवाढ मिळणार आहे. या योजनेच्या अनुषंगाने कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर सेवा निधी अंतर्गत करमुक्त ११ लाख ७१ हजार रुपये, सेवा काळात विशिष्ट प्रतीकचिन्ह, उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्यास सैन्यदलांप्रमाणेच गौरव आणि पुरस्कार, ४८ लाख रुपयांचे विमा संरक्षण, सेवाकाळात मृत्यू झाल्यास कुटुंबाला अतिरिक्त ४४ लाख रुपये, अपंगत्व आल्यास एकरकमी १५ ते ४४ लाखापर्यंत अर्थसहाय्य मिळणार आहे.

या योजनेचा फॉर्म भरण्याची अंतिम तारीख ५ जुलै असून योजनेच्या माहितीसाठी रोहित जगताप (८६९१९३०७०९) या क्रमांकावर तसेच पनवेल भाजप मध्यवर्ती कार्यालयात संपर्क करावा, असे आवाहन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे.

# आमचे सरकार उर्वरित कार्यकाळ पूर्ण करेल

## ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास



**मुंबई : प्रतिनिधी**

आमचे सरकार उर्वरित अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करेल, असा विश्वास राज्याचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

एका मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी काही गोष्टींबद्दल भाष्य केले. मुलाखतींमध्ये मुख्यमंत्री शिंदे यांना हे सरकार अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करेल असे वाटते का, असा थेट प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना ते म्हणाले, पुढील अडीच वर्ष हे सरकार नक्की चालणार, कारण आमच्याकडे ५० आमदार आहेत. भाजपचे ११५ ते १२० जण आहेत. आमच्याकडे एकूण १७० आमदार आहेत. ज्यांच्याकडे बहुमत असते ते सरकार कार्यकाळ पूर्ण करते. एक मजबूत सरकार राज्याला मिळाले असून हे सामान्य जनतेच्या मनातील सरकार आहे.

पुढे बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी ही (भाजप आणि शिंदे गट) नैसर्गिक युती आहे. आम्ही बाळासाहेबांचे हिंदूत्व, विकासाचा मुद्दा पुढे घेऊन चाललोय. जे प्रकल्प सुरू आहेत ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे आमचे लक्ष्य आहे. या राज्यातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

### ...म्हणून ठाकरे सरकारमधून बाहेर पडलो!

आमदारांना अडीच वर्षात जे अनुभव आले ते पाहता त्यांनी एक नवा मार्ग निवडला. प्रत्येकाला आपल्या मतदारसंघामध्ये विकास करायचा आहे, मात्र त्यांना तो करता येत नव्हता. सरकारमध्ये असूनही काम करता येत नव्हते. म्हणून ते नाराज होते आणि त्यामुळेच बाहेर पडले, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या वेळी म्हणाले.

# एकनाथ शिंदे यांना नेतेपदावरून हटविणे बेकायदेशीर, उत्तर देऊ!

## प्रवक्ते दीपक केसरकर यांचा इशारा



**पणजी : वृत्तसंस्था**

शिवबंधन हे खरे नाते, ॲफिडेव्हिट हे खरे बंधन नाही. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काही वक्तव्य केले तर आम्ही उत्तर देणार नाही. शिवसेने एकनाथ शिंदे यांना नेतेपदावरून हटविल्याचे पाठवलेले पत्र बेकायदेशीर आहे. यावर आम्ही कायदेशीर उत्तर देऊ. त्यांनी ऐकले नाही, तर पुढील भूमिका घेऊ, असा थेट इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी दिला आहे.

एकनाथ शिंदे यांनी आपण शिवसेनेचेच आहोत, असे वारंवार सांगितले, मात्र शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना ही बाब रूचलेली नाही. शिंदे शिवसेनेचे मुख्यमंत्री नाहीत. शिवसैनिकांमध्ये जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला. त्यानंतर शिंदे यांची शिवसेना नेते पदावरुन हकालपट्टी करण्यात आली होती. शिवसेनेने याबाबतचे पत्र काढले आहे. या कारवाईमुळे आता शिंदे विरुद्ध ठाकरे असा वाद चिघळण्याची शक्यता होती. या पार्श्वभूमीवर शनिवारी (दि. २) शिंदे गटाकडून उत्तर देताना इशारा देण्यात आला आहे. याबाबत दीपक केसरकर यांनी गोव्यात पत्रकार परिषद घेत उत्तर दिले.

सभागृहाच्या नेत्याचा अपमान होतो तेव्हा हक्कभंग येतो. इतके हे पद महत्त्वाचे आहे. त्यांच्या पक्षाला हे शोभणार नाही. ही कृत्य लोकशाहीला शोभादायक नाही. आमच्याकडे राजकारणाची चर्चा होत नाही. कायदेशीर लढाई असेल तर त्याला कायदेशीर उत्तर देऊ. पहिल्यांदा अध्यक्ष निवड व त्यानंतर विश्वासदर्शक ठराव येईल. मग मंत्रिमंडळाची चर्चा होईल. आता कोणतीच चर्चा त्या संदर्भात झालेली नाही. आमचे कुटुंब एकत्र आहे, पण आमचे कुटुंबप्रमुख बाहेर आहेत. ते आमच्यात आले तर आम्हाला आनंद होईल, असे दीपक केसरकर म्हणाले.

# उद्धव ठाकरेंना बनवाबनवी करण्यात पुरस्कार मिळेल

## आरे कारशेड प्रकरणावरून किरीट सोमय्या यांचा हल्लाबोल



**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांना बनवानवी करण्यात पुरस्कार मिळेल असा हल्लाबोल भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे. या वेळी त्यांनी शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टिका केली.

महाराष्ट्रात सत्तांतर झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने आरे कारशेड प्रकल्पाला परवानगी दिली आहे. त्यामुळे मुंबईत पुन्हा एकदा आरे प्रकरणावरून चर्चा सुरु झाली आहे. याच मुद्द्यावरून संवाद साधताना किरीट सोमय्या यांनी उद्धव ठाकरेंवर खोचक टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांना बनवाबनवी करण्यात नोबेल पुरस्कार मिळू शकतो, अशा शब्दांत त्यांनी टीका केली आहे.

मुंबई मेट्रो प्रकल्पाबाबत बोलताना त्यांनी म्हटले की, येत्या सहा ते सात महिन्यात आरे कारशेड प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकते. त्यामुळे वर्षभरात मुंबईत मेट्रोदेखील धावायला सुरुवात होईल. परिणामी मुंबईल लोकलवरील बराचसा भार कमी होईल,असेही सोमय्या म्हणाले. उद्धव ठाकरेंवर टीका करताना सोमय्या पुढे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांना बनवाबनवी करण्यात नोबेल पुरस्कार मिळू शकतो. त्यांनी केवळ आरे कारशेडचे काम बंद पाडले नाही, तर त्यामुळे बाकीची कामेदेखील ठप्प झाली. दरम्यानच्या काळात मेट्रोचे डबे बनवणाऱ्या कंपन्यांनी करार रद्द केले. तर कर्ज वितरीत करणाऱ्या संस्थांनीदेखील हात आखडता घेतला. पण महाराष्ट्रात आता एकनाथ शिंदे आणि फडणवीस सरकार आले आहे. त्यामुळे मेट्रोच्या कामांना गती मिळणार आहे, असेही ते म्हणाले. सोमय्या पुढे बोलताना म्हणाले, दरवर्षी मुंबईत बांधकामांची अनेक कामे होत असतात. गेल्या २५ वर्षांत मुंबई महापालिकेत ठाकरेंची सत्ता आहे. दरम्यानच्या काळात त्यांनी किती झाडे तोडण्यास परवानगी दिली. ठाकरे उल्लू बनविण्याचे धंदे करतात. मुंबईत कोस्टल रोड बनवत असताना शेकडो झाडे तोडली गेली. उद्धव ठाकरेंचा अहंकार आणि गोरगावच्या खासगी बिल्डरमुळे हे काम बंद पडलं होते, असा आरोपही सोमय्या यांनी यावेळी केला. सोमय्या यांनी ठाकरेंवर जोरदार टीका केली.

## फसवणूक करणारे दोघे अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

लोकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने काळा सोनेरी रंगाचा स्टोन या नावाने विक्री करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अब्दुल सत्तार अब्दुल रहीम (वय ५२, रा. कर्नाटक) व मोहम्मद तनवीर शब्बीर खान (वय ३२, रा. तेलंगणा) अशी दोघांची नावे आहेत.

काळ्या सोनेरी रंगाचा किमती दगड या नावाने विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा, नवी मुंबई यांना मिळाली होती. त्यानुसार पार्थ हॉटेल, सेक्टर ६, कामोठे येथे पोलिसांनी सापळा रचला. या वेळी पार्थ हॉटेल समोर येणाऱ्या रस्त्यावर दोन व्यक्ती पायी चालत असताना दिसून आले. त्यांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडे काळ्या सोनेरी रंगाचे दगड सापडून आले. या वेळी त्यांनी हे दगड विक्री करण्यासाठी आणले असल्याचे सांगून हे दगड रेडियोॲक्टिव या नावाने मोठ्या रकमेत विक्री करून फसवणुकीच्या इराद्याने आणले असल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी दोन्ही आरोपींना दगडांसह अटक केली. अधिक तपास सुरु आहे.

# कल्याणमध्ये शॉर्टसर्किटच्या आगीत महिलेचा होरपळून मृत्यू

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याण पूर्व येथील चिंचपाडा गावात एका बंगल्यात मध्यरात्री शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत एका महिलेचा होरपळून मृत्यू झाला. यावेळी आग विझविताना चार जण गंभीररित्या भाजले आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

कल्याण पूर्व भागातील चिंचपाडा गावातील आई बंगल्यात मध्यरात्री शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. या बंगल्यातील निवासी म्हात्रे कुटुंबीय गाढ झोपेत होते. आगीच्या झळा लागताच म्हात्रे कुटुंबीय जागे झाले. तोपर्यंत आगीने घरात रौद्ररुप धारण केले होते. आगीतून घराबाहेर कसे पडायचे असा प्रश्न म्हात्रे कुटुंबीयांसमोर उभा राहिला.

दरम्यान, आग विझविण्याचा प्रयत्न म्हात्रे कुटुंबीयामधील मुलगा व त्यांच्या इतर तीन सदस्यांनी केला. ते प्रयत्न अपुरे पडले. यामध्ये जयश्री भरत म्हात्रे महिलेचा आगीत होरपळून मृत्यू झाला. आग विझविणारे घरातील चारही जण आगीच्या झळांनी भाजले. आगीच्या ज्वाला, धुरातून वाट काढत ते बाहेर पडले. त्यामुळे बचावले. या दुर्घटनेत मृत पावलेल्या जयश्री यांचे पती भरत हात्रे उत्तर भारतात देव दर्शनाला गेल्याचे या भागातील रहिवाशांनी सांगितले. शेजाऱ्यांनी ही माहिती अग्निशमन दलाला दिली. जवान घटनास्थळी पोहचताच आग इतरत्र भडकणार नाही याची खबरदारी घेत प्रथम आग विझविली. त्यानंतर बंगल्याला लागलेली आग आटोक्यात आणली. या संदर्भात विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात जयश्री म्हात्रे यांच्या मृत्यूप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. आगीचे नक्की कारण कळू शकले नाही. शॉर्टसर्किटमुळे आग लागली असण्याची शक्यता जवानांनी व्यक्त केली.

# लोकनेते दि. बा. पाटील विमानतळ नामकरण मान्यतेसाठी तातडीने कार्यवाही करावी

## आमदार गणेश नाईक यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील स्थानिक, कष्टकरी, शेतकरी यांच्या अस्मितेसाठी, प्रकल्पग्रस्तांच्या विकासासाठी तसेच त्यांच्या मागण्यांसाठी लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे मोलाचे योगदान पाहता 'दिबां'ची कर्मभूमी असलेल्या भूमीवर साकारत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास त्यांचे नाव देण्याच्या मान्यतेसाठी तत्परतेने कार्यवाही करण्याची मागणी आमदार गणेश नाईक यांनी केली आहे. नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय विमान वाहतूकमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना या संदर्भात त्यांनी पत्र पाठवले आहे.

लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मिळावे ही भूमीपुत्रांची आग्रही मागणी आहे. या मागणीसाठी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने साखळी आंदोलन, सिडको घेराव आंदोलन, मशाल मोर्चा इत्यादी आंदोलनांमध्ये नवी मुंबई, उरण, पनवेल, ठाणे, रायगड, मुंबई, पालघर येथील प्रकल्पग्रस्त, ग्रामस्थ तसेच विविध जिल्ह्यांतील बांधव लाखोंच्या संख्येने रस्त्यावर उतरून एकत्रित झाले होते. गेली अडीच वर्षे विमानतळ नामकरणाचा पूर्वीचा ठराव विखंडीत करून लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचा ठराव करावा यासाठी अनेकदा निवेदनेदेखील दिली, पण महाविकास आघाडी सरकारने कोणताही निर्णय घेतला नाही, परंतु २९ जून रोजी झालेल्या महाविकास आघाडी मंत्रिमंडळाच्या शेवटच्या बैठकीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यास मान्यता देण्यात आली असून त्याबाबतचा ठराव केंद्र शासनाकडे पाठवून त्यास लवकरात लवकर मान्यता मिळण्यासाठी राज्य शासन स्तरावरून कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठवून त्यास लवकरात लवकर मंजुरी मिळवण्यासाठी कार्यवाही करण्याची मागणी आमदार गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि केंद्रीय नागरी उड्डाणमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात केली आहे.

# भानघर जि. प. प्राथमिक शाळेत शिक्षण परिषद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोरोनाच्या महामारीत शिक्षणाप्रती आपण काय कमावले आणि काय गमावले याचा आढावा घेण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणानुसार दरमहा होणाऱ्या शिक्षण परिषदेपैकी सन २०२२-२३ चे नेरे विभागातील शाळांची पहिली शिक्षण परिषद रा.जि.प.प्राथमिक शाळा भानघर (दि. २९) येथे झाली.



कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन, स्वागतगीत व महिला सक्षमीकरणावर पोवाडा गाऊन केली. शाळेच्या मुख्याध्यापिका योगिनी वैदू यांनी भानघरचे सरपंच शांताराम पोपेटा, केंद्रप्रमुख गीता तिगडे तसेच सर्व शाळांचे मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका व शिक्षक यांना गुलाब पुष्प, शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका वैदू यांनी केले.

त्यानंतर केंद्रप्रमुख तिगडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले, सर्वच शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षणाप्रती महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. त्यामुळे सर्वच शाळांची पटसंख्या वाढत आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे. आपण शाळापूर्व मेळावा घेतला त्याचा सर्व शाळांना फायदा झाला. सर्वच शाळांनी आपापले कौशल्य दाखवत स्थानिक मंडळींचे सहकार्य घेत मुलांना ढोल ताश्याच्या तालावर, बैलगाडीमध्ये बसवून वाजत-गाजत शाळेत दाखल केले. याचा विलक्षण आनंद सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना झाला. त्यानंतर विविध शाळेच्या मुख्याध्यापकांनी १०० टक्के मुले शाळेत दाखल करण्यासाठी केलेले प्रयत्न, शाळापूर्व तयारी सादरीकरण, आरटीई २००९, आपत्कालीन व्यवस्थापन, परिपत्रक वाचन या विषयावर परिसंवाद घेण्यात आले. शाळेत मुलांना दाखल करताना कोणकोणत्या अडचणी येऊ शकतात त्यातून मार्ग कसा काढावा, पुढील वर्षभरासाठी आपण कोणते नियोजन केले आहे, याबाबत चर्चा झाली. केंद्रप्रमुख तिगडे यांनी त्याला समर्पक उत्तरे दिली व मार्ग सूचविले, शासनाच्या चौकटीत कोणती कामे येतात व स्थानिक ग्रामस्थ, प्रतिनिधींच्या माध्यमातून कोणती कामे करता येतात याचीही माहिती दिली. दरम्यान, संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध गायक रवी जाधव यांनी शाळेला भेट दिली. तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने कार्यरत असणारे सामाजिक कार्यकर्ते यशवंत बिडये यांनी कथाकथन करत विविध उपक्रमांची माहिती दिली. अशाप्रकारे शिक्षण, कला आणि सेवा या त्रिवेणी संगमाने माहे जून २०२२ केंद्र नेरे यांची शिक्षण परिषद रा.जि.प.प्राथ. शाळा भानघर येथे मोठे आनंद, उत्साह आणि प्रसन्न वातावरणात संपन्न झाली. शाळेचा वर्ग, शाळेचा आवार हा प्रसन्नमय व सुंदर सजावटीने सुशोभित केल्याचे उपस्थितांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. सकाळी ११ ते सायं.५पर्यंत चाललेल्या या मेळाव्यात पोषण आहार, शाळाबाह्य विद्यार्थी, नवीन वर्षाचे नियोजन अशा अनेक विषयांवर चर्चा करून मार्ग काढण्याची चर्चा करण्यात आली. शेवटी गणेश पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

पान १ वरून

## किल्ले रायगडच्या पायथ्याजवळ असलेल्या गावात जमिनीला भेगा

हा प्रकार त्यांनी ग्रामस्थांना सांगितला तसेच महाड येथील तहसील कार्यालयाशी संपर्क साधण्यात आला. ही माहिती मिळताच तहसीलदार सुरेश काशीद, नायब तहसीलदार प्रदीप कुडाळ, पोलीस उपअधीक्षक निलेश तांबे घटनास्थळी रवाना झाले.

प्रशासनाकडून रायगड परिसरातील काही गावांची पाहणी केल्यानंतर जमिनीला भेगा पडलेल्या असल्याचे आढळून आले. या परिसराची आता भूवैज्ञानिक विभागाकडून पाहणी करण्यात येणार असून सुरक्षितेच्या दृष्टीने योग्य ते उपाय प्रशासनाकडून योजले जातील, असे महसूल विभागाकडून सांगण्यात आले.

## राज्यभरातील शाळांमध्ये आता आनंददायी अभ्यासक्रम

**पुणे : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना आनंद देणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांचा शालेय शिक्षणात समावेश करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी राज्यभरातील शाळांमध्ये आनंददायी अभ्यासक्रम राबविला जाणार आहे.

या अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी गोष्ट, छोटे खेळ, अनुभवकथन, श्वासांवरील क्रीया, मुक्त हालचाली, चालण्याची पद्धत, प्रसंगनाट्य, गाणी, कवितांचे सादरीकरण, अवांतर वाचन अशा अनेक उपक्रमांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम राखणे, विद्यार्थ्यांत सामाजिक, भावनिक कौशल्ये विकसित करणे, विद्यार्थ्यांचा ताण कमी करणे, संभाषण कौशल्य विकसित करणे, शिकण्याची तयारी खेळीमेळीच्या वातावरणातून तयार करून घेणे या उद्देशाने आनंददायी अभ्यासक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या वर्षी हा उपक्रम भोर तालुक्यात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आल्यानंतर आता राज्यभरातील शाळांमध्ये या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली जाणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णयाद्वारे स्पष्ट केले आहे. सजगता, गोष्ट, कृती आणि अभिव्यक्ती अशा चार प्रकारांमध्ये हा उपक्रम राबवला जाणार आहे. आनंददायी अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शाळांना परिपाठ झाल्यानंतर पहिल्या तासातील ३५ मिनिटांमध्ये करण्याच्या सूचना शिक्षण विभागाने दिल्या आहेत. प्रत्येक दिवशी ठरलेल्या नियोजनानुसार परिपाठ झाल्यानंतर पुस्तकी शिक्षण सुरू करण्याआधी आनंददायी अभ्यासक्रम होईल असे सांगण्यात आले.

## खारघरमध्ये रथयात्रा



**पनवेल : वार्ताहर**

खारघरमध्ये कोरोना महामारीमुळे गेल्या दोन वर्षांपासून भगवान जगन्नाथाची रथयात्रा काढण्यात आली नव्हती. यावर्षी रथयात्रेत सहभागी होण्यासाठी दूरदूरहून लोक आले होते. कोणतीही कसर न ठेवता जय जगन्नाथाचा रथ हा भक्त ओढताना दिसले. यामध्ये हजारो श्री जगन्नाथ भक्त सहभागी झाले होते.

गेल्या १५ वर्षांपासून नवी मुंबई खारघर येथील जय जगन्नाथ लोकतरण ट्रस्टतर्फे भगवान जगन्नाथजींच्या रथयात्रेचे आयोजन केले जाते. यंदा आयोजक सरपार पगडी आणि लालकुर्ता घालून दिसले. येथे रथासमोर गोटीपुआ नृत्य केले जात होते. ही यात्रा ९ दिवस चालणार आहे. यात्रेमुळे उत्साह दिसून येत होता.

# दिघोडे येथील विद्यालयात वृक्षारोपण

**उरण : रामप्रहर वृत्त**

कृषी दिन सप्ताहाचे औचित्य साधून दिघोडे येथील महात्मा गांधी विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी शालेय समितीचे उपसभापती गणेश पाटील यांच्या हस्ते रोप लावण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक एन. एन. नाईक, शिक्षक, विद्यार्थी मिळून ५० ते ६० वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व आपली शाळा सुंदर बनविण्यासाठी ज्येष्ठ शिक्षक एस. टी. फल्ले यांनी वृक्षारापेणाचे महत्त्व सांगितले. वृक्षारोपणाच्या घोषणा देऊन कार्यक्रम उत्साहात झाला.



# वह्यावाटपाद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उलवे नोड १ व २ आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने वह्या वाटपाचा कार्यक्रम राबवण्यास सुरुवात झाली. या अंतर्गत शुक्रवारी (दि. १) पनवेल तालुक्यातील शेलघर, बामणडोंगरी, बेलपाडा, जावळे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मोफत वह्यांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवून गरीब व गरजूंना नेहमीच मदतीचा हात देणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात येते. या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

या वेळी शेलघर अध्यक्ष अमृतशेठ भगत, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, सुहास भगत, अनिल कोळी, श्रीधर भगत, ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रल्हाद भगत, अजय भगत, रमेश घरत, राजू भगत, प्रभाकर भगत, माजी सदस्या इंदूताई पाटील, अशोक घरत, सतिश म्हात्रे, संतोष म्हात्रे, बेलपाडा अध्यक्ष गणेश पाटील, द. जा. कोळी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेश पाटील, उपाध्यक्ष अतिश पाटील, अशोक कोळी, निशा कोळी, प्रणाली ठाकूर, कविता म्हात्रे, अश्विनी कोळी, अंकुश ठाकूर, साजन भोईर, वहाळ ग्रामपंचायतीच्या सदस्या गिता ठाकूर, मनोज नाईक, बामणडोंगरी गाव अध्यक्ष नंदकुमार ठाकूर, दीपक गोंधळी, पदाजी नाईक, निलेश खोत, चिटणीस रवी शिंदे, उलवड नोड १ अध्यक्ष मदन पाटील, रामदास नाईक, मनोज नाईक, सुवर्णा ठाकूर, समाधान पाटील, निलेश म्हात्रे, अलंकार म्हात्रे, सांस्कृतीक सेल अध्यक्ष नान गडकरी, प्रसाद घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात शेलघर येथील शाळेत १०७, बेलपाडा येथील शाळेत ३६४, बामणडोंगरी येथील शाळेत ११३३ तर जावळे येथील शाळेत १३२ वह्यांचे वाटप करण्याय आले.





पनवेल : स्वानंद सुख निवासी चांगू काना ठाकूर यांच्या १९व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस स्नुषा शकुंतला ठाकूर, तसेच भाजप नेते वाय. टी. देशमुख, कान्हाशेठ ठाकूर यांनी अभिवादन केले.







पनवेल : स्वानंद सुख निवासी चांगू काना ठाकूर यांच्या १९व्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजीनगर येथे भावभक्ती महिला भजन मंडळ (गव्हाण-कोपर), श्री गुरूकृपा प्रासादिक भजन मंडळ (खारकोपर) यांच्या भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी गायिका हिराबाई घरत, आनंदी घरत, पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, चंद्रभागा घरत, सुप्रिया घरत व वादक तुषार घरत यांनी आपली कला सादर केली.

# पनवेलमध्ये चांगला पाऊस झाल्याने देहरंग धरणातील पाणीसाठा वाढला



**खारघर : प्रतिनिधी, पनवेल : वार्ताहर**

मागील काही दिवसापासून पनवेलमध्ये चांगला पाऊस झाल्याने देहरंग धरणातील पाणी साठ्यात वाढ झाली आहे.यामुळे पनवेलकरावरील दिवसाआड पाण्याचे संकट टळले आहे.शहरात पाणीपुरवठा सुरळीत झाला असल्याची माहिती पालिकेचे पाणीपुरवठा अधिकारी विलास चव्हाण यांनी दिली.

सध्याच्या घडीला पाण्याची पातळी तीन मीटरने वाढली आहे. पनवेल शहराला दिवसाला ३२ एमएलडी पाणी लागतो. देहरंग धरणातून पाणीसाठा संपुष्ठात आल्याने पालिकेला एमजेपी कडून जादाचे पाणी घ्यावे लागले होते, मात्र धरणातील पाणीसाठा वाढल्याने पनवेलचे संकट टळले आहे. पनवेल महापालिकेच्या २७७ हेक्टर जमीनीपैकी १२५ हेक्टर क्षेत्रावर हे धरण बांधण्यात आले आहे. पनवेल शहरातील वाढत्या लोकसंख्येची तहान भागवण्यासाठी देहरंग धरण महत्वपूर्ण आहे. या धरणातून पनवेल शहराला रोज १२ एमएलडी पाणी पुरवठा करण्यात येतो. ३.५७ दशलक्ष घनमीटर साठवण करण्याची क्षमता या धरणाची आहे. शहरातील पाणी टंचाईमुळे पालिकेला विकतचे पाणी घ्यावे लागत असून लाखो रुपये याकरिता खर्च करावे लागत आहेत.

पावसाळा सुरुवात झाल्याने शहरवासियांना सध्या तरी पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार नसून मे महिन्यापर्यंत धरणातील पाणी पालिकेच्या वापरात येत असतो. यावर्षी पाऊस लांबल्याने शहरवासियांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागले होते.

# रिटघर हायस्कूलमध्ये मोफत गणवेश वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते श्री रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वितरण सोहळा विद्यालयाच्या सभागृहात ए.एस. सी. कॉलेज पनवेल (पदवीधर ग्रुप सन १९८९) यांच्या उपस्थितीत झाला.



कार्यक्रमासाठी स्कूल कमिटी सदस्य राजेश भोपी, वंदना भोपी, दीपक पाटील (पोलीस पाटील), सामाजिक कार्यकर्ते महादेव गायकर, गीता नारकर, अंजली जाधव, मीना जगताप, पुष्पा पडवळ, प्रचिता कडू, सुलोचना कडू, माधवी सदागरे, मंगल झमसे, दिपाली रामधरणे, स्मिता राहाळकर व तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका बी. एस. नाईक व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

ए. एस. सी. कॉलेज पनवेल (पदवीधर ग्रुप सन १९८९) ग्रुप (२५ ड्रेस), राहूल ड्रेसेस पनवेल (१५ ड्रेस) व विद्यालयातील सर्व सेवक वृंद (२० ड्रेस) या सर्वांच्या वतीने इयत्ता पाचवी ते आठवीच्या ५५ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार एम. बी. शेळके यांनी मानले.

# कामोठे येथे डॉक्टर्स डे उत्साहात

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

डॉक्टर्स डेच्या निमित्ताने कामोठे डॉक्टर्स असोशिऐशनच्या वतीने कराडी समाज हॉल कामोठे येथे कोविडमध्ये ज्यांनी समाजाची सेवा केलेल्या डॉक्टर्स आणि हॉस्पिटल यांना पनवेल महापालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते मान्यवर डॉक्टर्सला सन्मानित करण्यात आले.





या वेळी रक्तदान शिबिरसुद्धा आयोजित केले होते. यामध्ये बहुतेक डॉक्टरांनी रक्तदान केले. कामोठे डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हेमंत पाटील, उपाध्यक्ष डॉ. खडबडे, सेक्रेटरी डॉ. संतोष कन्गूले, खजिनदार डॉ. गणेश साळे तसेच कामोठे डेन्टिस्ट वेलफेयर असोसिएशनच्या अध्यक्ष डॉ. स्वाती गणेश वारे, सेक्रेटरी डॉ. अनिकेत आवरे व आदी डॉक्टर्स उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, कामोठे डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हेमंत पाटील, उपाध्यक्ष डॉ. खडबडे, सेक्रेटरी डॉ. संतोष कन्गूले, खजिनदार डॉ. गणेश साळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कामोठे डेन्टिस्ट वेल्फेअर असोसिएशनच्या अध्यक्ष डॉ. स्वाती गणेश वारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# डॉक्टर दिनानिमित्त राजीव बुधकर यांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त भाजपच्या वतीने पनवेलमध्ये डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. भाजप पनवेल शहर कोषाध्यक्ष देवांशू संतोष प्रभाळे यांनी डॉ. राजीव बुधकर यांचा डॉक्टर दिनानिमित्त सन्मान केला.



राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त आपणांस व आपल्या सर्व सहकाऱ्यांना माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा. समाजामध्ये सर्वांत मानाचा व उच्च समजला जाणारा डॉक्टरी पेशा आपण स्वीकारलात आणि त्याच्याशी प्रामाणिक राहून रुग्णाची केलेली सेवा ही साक्षात पनवेलकरांसाठी संजीवनी ठरत आहे. आपल्या फक्त सहवासातून अनेक रुग्णांना बरे वाटते किंवा निम्मा आजार बरा होतो, अशी समजूत सर्वांमध्ये आहे आणि ते फक्त तुम्ही आजपर्यंत केलेल्या सेवेमुळे आणि कमविलेल्या विश्वासामुळे. माझा तुमच्याशी अगदी जवळून संबंध कोरोना काळात आला, त्या वेळेत तुम्ही जे काही काम केलेत हजारो रुग्णांसाठी देवदूत बनालात. अनेकांची कुटुंब उद्ध्वस्त होता होता वाचलीत. त्याबद्दल माझ्याकडून तुम्हाला मानाचा मुजरा, असे देवांशू प्रभाळे यांनी डॉ. राजीव बुधकर दिलेल्या सन्मानपत्रामध्ये म्हटले आहे.

# डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. अनिल परमार यांचा आज पदग्रहण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक कार्यात आघाडीवर असणारे पनवेलमधील सुप्रसिद्ध डॉक्टर रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर अनिल परमार यांचा पदग्रहण सोहळा पनवेलमधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रविवारी (दि. ३) सकाळी ९.३० वाजता समारंभपूर्वक होणार आहे.

या शानदार पदग्रहण सोहळ्याला दि रोटरी फाऊंडेशनचे ट्रस्टी पीआरआयडी डॉ. भारत पंड्या प्रमुख अतिथी म्हणून, तर रोटरी इंटरनॅशनलचे डायरेक्टर पीडीजी डॉ. महेश कोटबागी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे या वेळी प्रदीप दावकर हे रोटरी क्लब ऑफ नवीन पनवेलच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारतील. या पदग्रहण सोहळ्याला समाजातील दानशूर व्यक्ती यांच्यासह रोटरीतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.


# खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये कॅम्पस मुलाखत

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन, प्लेसमेट सेल समुपदेशन केंद्र व आय.क्यू.ए.सी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २) सकाळी १० ते ४ या वेळी घेण्यात आली होती. कॅम्पस मुलाखती घेण्यासाठी ओरनेट कंपनीचे सर्व पदाधिकारी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये आले होते.

या मुलाखतीसाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व विद्यार्थीनी मुलाखतीसाठी उपस्थित होते. ओरनेट कंपनीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अर्जधारकांच्या अर्जाची योग्य पदधतीने छाननी केली व मुलाखतीसाठी पात्र असणाऱ्या अर्जधारकांच्या मुलाखती घेतल्या आणि कौशल्यधारित अर्जधारकांची निवड केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, करिअर मार्गदर्शन केंद्र व प्लेसमेट सेलचे समन्वयक प्रा. रेवण शिंदे, प्रा. महेश्वरी झिरपे सर्व प्राध्यापक वृंद व कर्मचारी वर्ग या सर्वांनी कॅम्पस मुलाखती यशस्वी केल्या. कॅम्पस मुलाखतीचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख व संस्थेचे चेअरमन सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.





# सीकेटी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा सेमिनार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात मंगळवारी (दि. ५) सकाळी ११ वाजता युपीएससी, एमपीएससी, बँक, रेल्वे इत्यादी स्पर्धा परीक्षेसंबंधी सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून तरुण आणि तडफदार आयएएस ऑफिसर वैभव काजळे आणि जळगाव जिल्ह्याचे महिला व बालविकास अधिकारी विजयसिंग परदेशी (वर्ग-१) हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर असून संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे सचिव एस. टी. गडदे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील, स्पर्धा परीक्षा समितीचे चेअरमन जे. एम. पावारा यांची उपस्थिती लाभणार आहे.

पदवीपूर्व शिक्षण घेत असलेले आणि सर्व पदवीधर विद्यार्थ्यांनी या सेमिनारचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सी. डी. देशमुख सेंटर फॉर अ‍ॅडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसेसचे इनचार्ज संजय एम. हिरेमठ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९८६७४९८१६१, ९२२३५५५७७९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन कॉलेजच्या वतीने करण्यात आले आहे.



# बाजाराच्या तीव्र चढउतारात टिकून राहण्यासाठी

**शेअर बाजारातील सध्याचे चढउतार सर्वसामान्य गुंतवणुकदारांना पेलवणारे नाहीत. अशावेळी अनेक भारतीय गुंतवणूकदार बाजाराच्या गुंतवणुकीपासून लांब जातात. अशा गुंतवणूकदारांनी बाजारातील गुंतवणुकीचा फायदा म्युच्युअल फंडाच्या मार्गाने का आणि कसा घेतला पाहिजे?**


या वर्षी जानेवारीत ६१ हजार अंश पार करणारा शेअर बाजाराचा सेन्सेक्स पुढील सहाच महिन्यात म्हणजे जूनमध्ये सुमारे १०हजारांनी म्हणजे ५१हजारांवर खाली आला. एवढेच नव्हे तर नंतरही अगदी कमी कालावधीत त्याने गुंतवणूकदारांना भीतीदायक असा लंबक दाखविला. एकाच दिवसात हजार, पंधराशे अंशांच्या गटांगळ्या किंवा तेवढीच तेजी तो दाखवितो आहे. जे शेअर बाजाराला सरावलेले आहेत किंवा पट्टीचे गुंतवणूकदार आहेत, ते हा धक्का पचवू शकतात, कारण त्यांच्याकडे अधिक भांडवल असल्याने शेअर बाजार पडला की शांत बसायचे, हे त्यांना माहीत असते. पण जे नवीन असतात, तेही पडझड सहन करू शकत नाहीत. उलट, चांगले शेअर या काळात ते विकून टाकतात किंवा नवी खरेदी करण्याची घाई करून त्यात अडकून बसतात. तर काही जण, नको ती शेअर बाजाराची वाट, असे ठरवून नंतर शेअर बाजाराचे नाव घेत नाहीत. पण त्यामुळे, महागाईशी स्पर्धा करू शकणारा परतावा देणाऱ्या या गुंतवणुकीपासून ते दूर राहतात. शेअर बाजारातील गुंतवणूक इतर गुंतवणूक प्रकारांवर मात करते, असे म्हटले जाते आणि बहुतांश वेळा ते खरेच आहे. पण मग अशा गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातील संपत्ती निर्माणाचा फायदा घ्यायचा नाही काय, असा प्रश्न पडतो.

शेअर बाजाराच्या गुंतवणुकीचा फायदा अधिकाधिक सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोचविण्याचा मार्ग म्हणजे म्युच्युअल फंड होय. जगभर लोकप्रिय असलेला हा मार्ग आता भारतीय नागरिकही प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर वापरू लागले आहेत. भारताच्या लोकसंख्येची तुलना करता हे प्रमाण अजून खूपच कमी असले तरी गेल्या तीन–चारवर्षांतील त्यातील वाढ अचंबित करणारी आहे. त्यातून हा गुंतवणूक प्रकार भारतातही वेगाने वाढत असल्याचे दिसून येत आहे. नुकतीच प्रसिद्ध झालेली आकडेवारी तरी तेच सांगते. म्युच्युअल फंडांचे व्यवस्थापन करणाऱ्या भारतात ४४ कंपन्या आहेत. सध्या त्या तब्बल ३७ लाख कोटी रुपयांचे व्यवस्थापन करतात. गेल्या पाच वर्षातील वाढ सरासरी १६ टक्के म्हणजे अतिशय चांगली आहे. पण मुळातच ती कमी असल्याने जीडीपीशी त्याची तुलना केल्यास ते प्रमाण १६ टक्के पडते, ज्याची जागतिक सरासरी ७४ टक्के आहे. याचा अर्थ असा की, विशेषतः विकसित देशांमध्ये गुंतवणुकीसाठी हा मार्ग एवढ्या मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. शिवाय शेअर बाजाराच्या एकूण मूल्याचा विचार करावयाचा झाल्यास म्युच्युअल फंडाकडे असलेली मालमत्ता केवळ सहा टक्के आहे. हेच विकसित देशातील प्रमाण ३३ टक्के आहे.

अर्थात, गेल्या काही वर्षातील वाढ लक्षात घेता हे प्रमाण असेच वाढत जाईल आणि हा गुंतवणुकीचा प्रकार स्वीकारण्याची संख्या वेगाने वाढत जाईल, अशीच सध्याची सर्व आकडेवारी सांगते. उदा. चार पाच वर्षांपूर्वी एसआयपीच्या मार्गाने दर महिन्याला शेअर बाजारात आठ हजार कोटी रुपये येत होते, त्याचे प्रमाण सध्या १२ हजार कोटींवर पोचले आहे. विदेशी गुंतवणूकदारांनी गेल्या सात आठ महिन्यात भारतीय शेअर विक्रीचा सपाटा चालू ठेवला आहे, ते भारतीय बाजारातील सर्वात मोठे गुंतवणूकदार आहेत. त्यामुळे बाजार यावर्षी सातत्याने खाली येत राहिला आहे. तरीही त्याची घसरण मर्यादित राहिली कारण म्युच्युअल फंडाच्या मार्गाने बाजारात गुंतवणूक करणारे भारतीय होय. कारण त्यांनी गुंतविलेली रक्कम ही विदेशी गुंतवणूकदारांनंतरची सर्वात मोठी गुंतवणूक ठरली आहे. त्यामुळेच भारतीय शेअर बाजाराचे एकूण मूल्य या काळात आठ टक्क्यांनी खाली आले असताना म्युच्युअल फंडांच्या गुंतवणुकीने बाजाराला तारले आहे. गेल्या आर्थिक वर्षात तीन लाख कोटी रुपये या मार्गाने शेअर बाजारात आले, यावरून म्युच्युअल फंडांचे महत्व लक्षात येते. बाजार तुलनेने स्थिर राहण्यासाठी त्यात अशी खात्रीची भारतीय आणि संस्थात्मक गुंतवणूक वाढली पाहिजे.

पण अशी कितीही आकडेवारी दिली तरी बहुतांश भारतीय बाजारातील सध्याची ही पडझड सहन करू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. बाजारात जेव्हा तेजी असते आणि आपण किती कमी दिवसांत किती जास्त पैसे कमावले, असे आपल्या आजूबाजूचे लोक सांगू लागतात किंवा बाजारातील कमाईविषयीचे लेख प्रसिद्ध होऊ लागतात तेव्हा अशा कमाईचे आकर्षण वाटणे, हे अगदी साहजिक आहे. पण तुम्ही जर आतापर्यंत शेअर बाजारात गुंतवणूक करण्याचा अनुभव घेतला नसेल, तर त्याने अशा उच्चांकावर बाजार असताना थेट बाजारात कधीही गुंतवणूक करू नये. त्यामुळे अशा सर्वांनी आणि नव्याने शेअर बाजारातील गुंतवणुकीचा फायदा घेऊ इच्छीणाऱ्यांनी म्युच्युअल फंडाचाच मार्ग निवडला पाहिजे. याची पुढील काही कारणे आहेत.

१. थेट शेअर्समध्ये गुंतवणूक करण्यासाठी मोठी रक्कम लागते. मात्र म्युच्युअल फंडांत ५०० रुपयांनीही सुरवात करता येते.




२. बाजारात पाच हजारांवर कंपन्या आहेत. त्यातील कोणत्या कंपन्यांत गुंतवणूक करावी, हे वैयक्तिक गुंतवणूकदार पुरेशा अभ्यासाअभावी ठरवू शकत नाहीत. म्युच्युअल फंडचे व्यवस्थापक पूर्णवेळ त्याचाच अभ्यास करत असतात. त्यामुळे शेअर बाजार पडतो, तेव्हा नुकसान मर्यादित होते.

३. शेअर बाजार ही अधिक जोखीम असलेली गुंतवणूक आहे. जगातील अनेक घटनांचा त्यावर परिणाम होऊन बाजारात चढउतार होतातच. असे मोठे चढउतार सहन करण्याची नव्या गुंतवणूकदारांची तयारी नसते. त्यामुळे त्यांना मानसिक त्रास होतो. बहुतांश म्युच्युअल फंड हे शेअर बाजाराशीच संबंधित असतात, पण हे चढउतार म्युच्युअल फंडात तेवढे धक्कादायक नसतात.

४. दीर्घकालीन गुंतवणुकीचा संकल्प नव्या गुंतवणूकदारांनी केलेला असतो तरी ते बाजारातील चढउताराला घाबरून शेअर्सची खरेदी विक्री अधिक करतात. त्यामध्ये ब्रोकरेज, एसटीटी, असे कर जात असतात. म्युच्युअल फंडांची खरेदी विक्री करताना एवढे कर लागत नाहीत.

५. शेअर बाजारातील थेट गुंतवणूक ही लिस्टेड कंपन्यांमध्येच किंवा इंडेक्समध्येच केली जाऊ शकते, मात्र म्युच्युअल फंडाच्या मार्गाने डेट, सोने, रियल इस्टेट अशा संपत्तीच्या इतर प्रकारातही गुंतवणूक करता येते.

६. थेट गुंतवणुकीसाठी विशिष्ट कंपन्या निवडल्या आणि त्यांचे शेअर घेतले, तर त्यातील काही कंपन्यांचे भाव खूप खाली येवू शकतात. मात्र म्युच्युअल फंड व्यवस्थापक विशिष्ट कंपनीत जास्तीत जास्त (उदा.१० टक्के) गुंतवणूक करू शकतात. याविषयी सेबीचे नियम अतिशय कडक असल्याने गुंतवणूकदार अशावेळी सुरक्षित रहातात.


अर्थ प्रहर



यमाजी मालकर

(ymalkar@gmail.com)


७. शेअर बाजारातील थेट गुंतवणुकीतून झालेल्या नफ्यावर कर द्यावा लागतो, तेवढा कर म्युच्युअल फंडातून झालेल्या नफ्याला द्यावा लागत नाही.

८. थेट गुंतवणुकीत आपल्याकडील शेअरच्या किमतीतील चढउतारामुळे अस्वस्थता येवू शकते. पण म्युच्युअल फंड गुंतवणूक कोणत्या कंपन्यांत आहे, याच्याशी आपला थेट संबंध नसतो, त्यामुळे या चढउतारांचा थेट त्रास होत नाही.

९. बाजारातील चढउतारांवर लक्ष ठेवून शेअर विकत घेणे किंवा योग्य वेळी त्यांची विक्री करणे, हे भल्याभल्यांना शक्य होत नाही. म्युच्युअल फंडात गुंतवणूक करताना मात्र आपण आपल्या सोयीने हे व्यवहार करू शकतो. हे व्यवहार आता ॲपवरही होऊ शकतात.

१०. रिटायरमेंट फंड, चिल्ड्रेन फंड तसेच टॅक्स सेवर असेही फंड असल्याने त्या–त्या उद्देश्यासाठी गुंतवणूक करण्याची संधी म्युच्युअल फंड देतात, पण थेट शेअर घेताना असे उद्देश्य पूर्ण होतीलच, असे खात्रीने म्हणता येत नाही. कारण थेट खरेदी विक्रीमध्ये जोखीम वाढते. कोरोनाच्या काळात अचानक कोसळलेला बाजार आणि आता युद्ध, महागाई आणि अमेरिकन फेडने लीक्वीडीटी कमी करण्याचा घेतलेला निर्णय, अशा कारणांनी शेअर बाजार अस्थिरच राहणार आहे. या चढउताराची सवय झाली की बाजार खाली आल्यावर आपल्या म्युच्युअल फंडातील गुंतवणूक वाढविली की परतावा वाढतो, जो थेट शेअरच्या खरेदी विक्रीतून मिळणाऱ्या परताव्याशी स्पर्धा करू शकतो. मात्र, बाजार पडला की, म्युच्युअल फंडात टप्प्याटप्प्याने गुंतवणूक करण्याचे धाडस करता आले पाहिजे.

**थेट शेअर खरेदी केल्यामुळे कंपन्यांचा मिळणारा डिव्हीडंड, बोनस शेअर, मतदानाचा अधिकार तसेच चांगल्या कंपन्यांच्या शेअरमध्ये होणाऱ्या वाढीचा फायदा मिळतो. तो म्युच्युअल फंड गुंतवणुकीत मिळत नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे. पण हे सर्व फायदे मिळविण्यासाठी शेअर बाजाराचा अभ्यास असायला हवा. असा अभ्यास असणाऱ्या गुंतवणूकदारांनाही अनेकदा मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागतो. पण त्यांच्याकडे भांडवलाची कमी नसल्याने ते त्यातून मार्ग काढतात. सर्वसामान्य गुंतवणूकदार मात्र त्या नुकसानीतून बाहेर येवू शकत नाहीत. त्यामुळे ज्यांची जोखीम पेलण्याची क्षमता आहे, त्यांनी शेअर बाजारात थेट गुंतवणूक करावी. मात्र ज्यांची सुरुवात आहे, त्यांनी एसआयपीच्या मार्गाने आणि बाजार खाली आल्यावर रक्कम म्युच्युअल फंडात गुंतवावी. किमान चार पाच वर्षे ही गुंतवणूक ठेवली तर चांगला फायदा मिळतो, असाच आतापर्यंत सर्वांचा अनुभव आहे.**

---

# बाजारात तांत्रिक विश्लेषणाला महत्व का आहे?

**शेअरबाजार सोप्पा आहे असे सर्वांनाच वाटते. खालच्या भावात खरेदी करायची अन् वरच्या भावात विक्री त्यात काय अवघड आहे. परंतु ग्रेटर फूल थिअरीप्रमाणे प्रत्येक भावात कोणी ना कोणी खरेदीदार व विक्रीदार असतो आणि तो स्वतःला चलाख समजत असतो कारण खालच्या भावात विकणाऱ्याला वाटत असते की भाव अजून खाली येतील तर घेणाऱ्याला वाटत असते की इथून भाव वर जातील. मग यातून कसा मार्ग काढायचा?**


दुरून डोंगर साजिरे ही एक म्हण आहे आणि या म्हणीच्या जवळ जाता जाता दऱ्या–खोऱ्या हा उत्तरार्ध प्रचलित आहे. परंतु या खोल दऱ्या–खोऱ्यांस जर आपण जवळ केले तर त्यातील आनंद शोधता येतोच. त्यांतील झुळझुळणारे झरे, त्यांच्या काठाने बहरलेली झाडाझुडुपांचे विश्व, त्यांच्या आधाराने विविध प्राणी व पक्षी यांचा होणारा मुक्त संचार अशी रम्य जागा जवळ जाऊन पाहताना साजरी वाटत नसते कां? त्यांवर चढउतार करण्याचा कष्टाचा भाग सोसला तर तिथले निसर्गसौंदर्य प्रेक्षणीय असते म्हणून तर सारी हिल स्टेशन्स इतकी लोकप्रिय असतात. कित्येक लोक मुद्दाम डोंगराळ भागात गिरीसंचाराला (ट्रेकिंगला) जातात.

तसेच, शेअरबाजार सोप्पा आहे असे सर्वांनाच वाटते. खालच्या भावात खरेदी करायची अन् वरच्या भावात विक्री त्यात काय अवघड आहे. परंतु ग्रेटर फूल थिअरीप्रमाणे प्रत्येक भावात कोणी ना कोणी खरेदीदार व विक्रीदार असतो आणि तो स्वतःला चलाख समजत असतो, कारण खालच्या भावात विकणाऱ्याला वाटत असते की भाव अजून खाली येतील तर घेणाऱ्याला वाटत असते की इथून भाव वर जातील. त्याचप्रमाणे अगदी वरच्या भावात खरेदी करणाऱ्यास वाटत असते की भाव अजून वाढतील आणि तेव्हा मी एखाद्या मूर्खास माझ्याकडील शेअर्स विकून टाकीन. हे चक्र अव्याहतपणे चालूच असते आणि यालाच शेअर बाजार म्हणतात.

आता प्रश्न आहे की, मग कोणत्याही कंपनीचा योग्य भाव कोणता? वॉरेन बफे म्हणतात, रास्त कंपनी अफलातून किंमतीत घेण्यापेक्षा अफलातून कंपनी ही रास्त किंमतीत घेणे कधीही चांगले आहे. परंतु १९ व्या शतकातील आयरिश कवी ऑस्कर वाईल्ड म्हणतात, उपेक्षावादी माणूस तो असतो ज्यास प्रत्येकाचे भाव माहीत असतात. मात्र त्यांचे मूल्य ठाऊक नसतात. कारण शेअरची अंगभूत किंमत निश्चित ठरवता येऊ शकत नाही आणि म्हणूनच वॉरेन बफे यांचे अजून एक वाक्य नमूद करावेसे वाटते, ते म्हणजे, भाव जो तुम्ही देता आणि बदल्यात आपल्याला जे मिळते ते मूल्य. भाव आणि मूल्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भाव व मूल्य यांच्यातील फरक समजून घेणे हे मूल्य गुंतवणूकीचे मुख्य तत्व आहे असे अनेक जण मानतात. मूल्य गुंतवणूक दोन प्राथमिक संकल्पनांशी संबंधित आहे– अवमूल्यन आणि अतिमूल्यांकन.

मूल्यामध्ये गुंतवणूक करणारा गुंतवणूकदार एखाद्या समभागाला त्याच्या अंतर्गत मूल्यापेक्षा कमी किंमतीत व्यवहार होताना त्याकडे एक संधी म्हणून पाहतात तर दुसरीकडे जेव्हा एखादा शेअर त्याच्या मूळ मूल्यापेक्षा जास्त किंमतीवर व्यवहार करत असतो, तेव्हा त्याचे अतिमूल्यांकन झालेय असे म्हटले जाते. पुन्हा प्रश्न येतो की अशी कोणती किंमत की जी अंडरव्हॅल्यू म्हणून समजली जाऊ शकते? आणि ही किंमत ज्यास समजेल तो त्या किंमतीत शेअर घेईलच. मग असे कोणते सूत्र आहे की ज्यामुळे ही रास्त किंमत समजू शकते? काहींचे असे म्हणणे असते की फंडामेंटल ॲनालिसिसद्वारे या अगम्य गोष्टींचा सुगावा लागतो. परंतु प्रत्येकालाच हे सूत्र मिळाले आणि एखाद्या शेअरचे असे अंगभूत मूल्य समजल्यास ग्रेटर फूल कोण ठरणार आणि जर अशी ठोस किंमत एकच असेल तर मग दररोज, प्रत्येक सेकंदागणिक शेअर्सचे भाव का बदलतात ?

याचे उत्तर आहे अपेक्षा आणि निराशा. शेअरच्या प्रत्येक भावामध्ये या भावना कमी जास्त फरकानं असतातच आणि या भावनाच प्रत्येक क्षणात शेअरचे भाव वरती खाली होण्यास भाग पाडतात. बाजारातील आवेगानुसार शेअरचे भाव सारखे बदलत असतात म्हणजेच मागणी व पुरवठा यामुळे शेअरच्या किंमती बदलतात. जर अधिक लोकांना शेअर विकत घ्यायचा असेल तर मागणी वाढून किंमत वर जाते आणि याउलट शेअरची विक्री करायची झाल्यास पुरवठा वाढून किंमत कमी होते. म्हणजेच बाजारामधील मागणी–पुरवठा जर शेअरचे भाव ठरवणार असतील तर मग शेअरची अंगभूत किंमत पुस्तकी ज्ञान घेऊन अभ्यासण्यापेक्षा या मागणी पुरवठ्याच्या हालचालींचाच अभ्यास करून शेअरचे व्यवहार पार पडतात. त्यासाठी तुलनेने सोयीस्कर असा तांत्रिक विश्लेषणाचा मार्ग अवलंबतात.




कंपनीचा मुलभूत अभ्यास करण्यासाठी प्रथमतः जागतिक अर्थव्यवस्था, स्थूल व सूक्ष्म अर्थव्यवस्था, देशाचा जीडीपी, प्रगतीची क्षेत्रे व त्यामधील उत्तम कंपन्या या गोष्टी अभ्यासाव्या लागतात आणि मग त्या कंपनीच्या शेअर्सचा रास्त भाव शोधण्यासाठी त्या वैयक्तिक कंपनीचा अभ्यास करावा लागतो. यालाच म्हणतात फंडामेंटल ॲनालिसिस. याउलट कोणत्याही कंपनीच्या शेअर्सना अधिक मागणी आहे ते तपासून असा शेअर खरेदी करून त्यामध्ये पुरवठा वाढू लागल्यास तो विकून टाकणे अनेकांना सोपे वाटते. अशा प्रकारच्या अभ्यासास टेक्निकल ॲनालिसिस म्हणतात. जर प्रत्येक शेअर खरेदीमागे त्यामधून पैसे कमावणे हाच उद्देश असेल तर मग टेक्निकल ॲनालिसिस तुलनेने सोयीस्कर वाटतो. तांत्रिक विश्लेषणाचा दृष्टिकोन केवळ बाजारातून उत्पन्न केलेले भाव व व्हॉल्यूम डेटावरून मूल्य प्राप्त करतो. परंतु, मूलभूत दृष्टीकोन वेगळ्या पद्धतीने आंतरिक मूल्यापर्यंत पोहोचतो. हे विविध आर्थिक, उद्योग आणि कंपनी डेटाचे विश्लेषण करून, शेअरच्या भावमूल्याचा अंदाज लावते व बाजाराबाहेरील माहिती समाविष्ट करते. शेअरभावाचे तांत्रिक विश्लेषण आणि कंपनीचे मूलभूत विश्लेषण यातील महत्त्वाचा फरक म्हणजे तांत्रिक विश्लेषण अधिक ठोस आणि वास्तविक बाजारातील मागणी–पुरवठा यामुळे होणारे भावबदल तपासते. मूलभूत विश्लेषण अधिक सैद्धांतिक आहे कारण ते शेअरचे अंतर्निहित दीर्घकालीन मूल्य निर्धारित करण्याचा प्रयत्न करते.

तांत्रिक विश्लेषण हे अधिक व्यावहारिक मानले जाऊ शकते कारण ते अस्तित्वात असलेल्या बाजाराचा आणि आर्थिक साधनांचा अभ्यास करते, जरी व्यापार क्रियाकल्प कधीकधी तर्कहीन असल्याचे दिसून आले तरी पुढील लेखांत आपण सोप्या भाषेत टेक्नीकल ॲनालिसिस शिकण्याचा प्रयत्न करणार आहोत.




प्रसाद ल. भावे

sharpadvisers@gmail.com


## परकीय गुंतवणूकदारांचा विक्रीचा सपाटा थांबेना

*मागील आठवड्यात संपलेल्या महिन्यात निफ्टी ५० हा राष्ट्रीय बाजाराचा समावेशक निर्देशांक १५७८० अंशांवर बंद झाला. जून अखेरीस संपलेल्या सहा महिन्यांत परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय शेअरबाजारात २,८३,४०५ कोटी रुपयांची निव्वळ विक्री केलेली आहे. जूनमधील त्यांच्या विक्रीचा आकडा हा ५८,११२ कोटी रुपये आहे. तांत्रिकी विश्लेषणानुसार निफ्टीसाठी १५७०० ही अत्यंत महत्वाची पातळी आहे. त्याखाली निफ्टी निश्चितपणे बंद झाल्यास अधिक पडझड होण्याची शक्यता वाटते. उलट दिशेस १६०००–१६३०० हा प्रतिकार टप्पा राहू शकतो. त्याचप्रकारे कच्च्या तेलाच्या किंमती, आतंरराष्ट्रीय घडामोडी, जागतिक व देशांतर्गत महागाईदर, अर्थव्यवस्था वाढीचा दर बदललेली कर प्रणाली अशा गोष्टी बाजाराची पुढील दिशा ठरवू शकतात. अर्थातच ट्रेडर्सना मंदी वा तेजीमध्ये दोन्हीकडे संधी असते तर गुंतवणूकदारांना चांगले शेअर्स कमी किंमतीत मिळण्याचे अप्रुप असते.*

---

## अर्थसाक्षर स्पर्धा : २५

### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. पुढीलपैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**

*ई.* बीएएसएफ इंडिया

**प्रश्न क्र. २. लाईफ इन्शुरन्स ऑफ कार्पोरेशन (एलआयसी) चे मुख्यालय या शहरात आहे.**

*इ.* मुंबई

**प्रश्न क्र. ३. अदानी उद्योग समूहातील कोणत्या कंपनीची अलीकडे शेअर बाजारात नोंद झाली?**

*आ.* अदानी विल्मर

**अर्थसाक्षर स्पर्धा २५ ची बरोबर उत्तरे :**

**आलेल्या सर्व उत्तरांपैकी एका स्पर्धकाची उत्तरे बरोबर आली असून त्या विजेत्या स्पर्धकांची नाव भरमा जयेंद्र हालोंडे. या स्पर्धकाला 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येत आहेत. त्यांनी सदर व्हाऊचर्स दुपारी २ ते ६ या वेळेत दैनिक राम प्रहरच्या कार्यालयातून घेऊन जावे. त्यांचे अभिनंदन!**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. टाटा उद्योग समूहातील सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीचे नाव काय आहे?**

*अ.* टाटा एलेक्सी | *आ.* टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)
*इ.* टाटा टेलिसर्व्हिसेस लिमिटेड | *ई.* टाटा सन्स लिमिटेड

**२. आपल्या देशातील सर्वाधिक बाजारमूल्य असलेली कंपनी कोणती?**

*अ.* रिलायन्स इंडस्ट्रीज | *आ.* टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)
*इ.* इन्फोसिस | *ई.* एल अँड टी

**३. शेअर बाजाराच्या सेन्सेक्स इंडेक्समध्येकिती कंपन्यांचा समावेश आहे?**

*अ.* १०० | *आ.* ३०
*इ.* ५० | *ई.* १०


Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.


**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# पोलादपूरमधील सवाद येथे कृषी दिन उत्साहात


(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

हरितक्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पोलादपूर तालुका कृषी अधिकारी व पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. १) सवाद येथे कृषी दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

सवाद ग्रामपंचायतीच्या सरपंच सुरेखा बुडबाडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात तालुका कृषी अधिकारी एन. वाय. घरत यांनी कृषी दिन साजरा करण्याबाबतची माहिती सांगून कृषी विभागाच्या फळबाग लागवड, यांत्रिकीकरण, विमा अशा विविध योजनांची माहिती दिली. गटविकास अधिकारी धनंजय जगताप यांनी वृक्षारोपण व पंचायत समितीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या योजनांविषयी माहिती दिली.

शासनाचा उद्यान पंडित पुरस्कार प्राप्त शेतकरी रामचंद्र कदम यांचा या वेळी सत्कार करण्यात आला तसेच आधुनिक शेती करणारे शेतकरी व शेतकरीगटांना प्रशस्तीपत्र व शेती उपयोगी पुस्तके देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी रामचंद्र कदम यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. पंचायत समितीचे माजी सदस्य यशवंत कासार यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती करण्याबाबत आवाहन केले. स्वच्छता समन्वयक गायकवाड यांनी स्वच्छतेबद्दल मार्गदर्शन केले. सहाय्यक मनोज जाधव यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी केले.

गावातील श्री शंकर मंदिर परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नाखले, कृषी अधिकारी वसावे, विस्तार अधिकारी धिवरे, मंडळ कृषी अधिकारी सूरज पाटील, सामाजिक कार्यकर्ते शौकत तारलेकर, कालवलीचे माजी सरपंच वाय. सी. जाधव, दत्तात्रय उतेकर यांच्यासह विविध ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी पर्यवेक्षक भरत कदम यांनी आभार मानले.

---

## जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचे कार्यालय,
## भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत कलम क्र. १९ ची अधिसूचना

याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) यांच्या कलम १३ च्या पोट कलम (१) द्वारे प्रधान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना दिनांक ११/०३/२०२२ अन्वये प्रारंभित अधिसूचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेली अधिसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलल्या जमिनीची, अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसची चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

जमिनीचे वर्णन

गाव :- पेंधर, तालुका :- पनवेल, जिल्हा :- रायगड

| अनुक्रमांक | गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १ | ९७ | ०.०५.४० |
| २ | ९९ | ०.३२.६० |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**अधिसूचना :- प्रकल्पाचे नाव :-** मौजे-पेंधर, ता. पनवेल येथील नवी मुंबई प्रकल्पासाठी (दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग-४ वर उड्डाण पुल (ROB)) बांधणेच्या प्रयोजनासाठी.

**निर्गमित प्रकल्पकार्याचे वर्णन :-** मौजे-पेंधर, ता. पनवेल येथील नवी मुंबई कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्वे नं. ९७, क्षेत्र ०.०५.४० हे.आर. व सर्वे नं. ९९, क्षेत्र ०.३२.६० हे.आर. जमिन मौजे-तळोजे (पाचनंद) येथील १२.५% योजना क्षेत्र व मौजे-खारघर, ता. पनवेल येथील नोड ही क्षेत्रे जोडण्यासाठी दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर उड्डाण पुलाचे (ROB) बांधकाम जलद गतीने करणेसाठी आवश्यक आहे.

**करण्यापूर्वी :- समाजाला मिळणारे लाभ :-** नवी मुंबई शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे प्रवास जलद गतीने व सुखकर होण्यासाठी उड्डाण पुल बांधणे आवश्यक आहे.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** निरंक

**अनुसूची-चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-** मौजे-पेंधर, ता. पनवेल येथे उड्डाण पुल बांधल्यास नवी मुंबई शहराची वाढ व विस्तार बघता नवी मुंबई प्रकल्पासाठी (दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग -४ वर उड्डाण पुल (ROB) बांधणे आवश्यक आहे.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक :- ३०/०६/२०२२**

**सही/-**
**(राहुल मुंडके)**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उप विभाग पनवेल**

## DISTRICT COLLECTOR RAIGAD, ALIBAG
## NOTIFICATION OF SECTION 19 UNDER RIGHT TO GET APPROPRIATE COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION, RESETTLEMENT ACT 2013

Whereas, the District Collector of Raigad District, with proper governance, is entitled to appropriate compensation for land acquisition, rehabilitation and resettlement, and by sub-section (1) of section 11 of the Right to Transparency Act, 2013 (30 of 2013) (hereinafter referred to as the Act) by using the powers, the notification, dated 11/03/2022, has been drawn in the initial notification and by that notification is made, along with a detailed description of the land done more in the attached Schedule A, Schedule two requires or is likely to require a more detailed specific public purpose.

And, after considering the report given by sub-section (2) of section 15, if any, by the Collector of Raigad District, it is convinced that the said land needs to be acquired for the said public purpose. Therefore, under the provisions of sub-section (1) of section 19 of the said Act, it is hereby declared that the said land is required for the public purpose.

And whereby the areas described in more detail in Schedule III are designated as Rehabilitation Areas for the purpose of rehabilitation and rehabilitation of the affected families, the summary of the Rehabilitation and Resettlement Scheme is specified in Schedule Four.

And wherever, under clause (c) of section 3 of the said Act, the District Collection, with proper governance, is designating the Deputy Divisional Officer, Panvel, to perform the functions of the District Officers under the said Act.

**Schedule-I**

Description of the Land

Village :- Pendhar, Tal. :- Panvel, District :- Raigad

| Sr. No. | Survey No. | Area in Hectares |
|---|---|---|
| 1 | 97 | 0.05.40 |
| 2 | 99 | 0.32.60 |

**Schedule-II**

Statement on the nature of public purpose

**Notification :- Project Name :-** For the purpose of construction of Flight Bridge (ROB) for Navi Mumbai project on Dive-Panvel Railway line and National Highway-4 at Village-Pendhar, Tal. Panvel..

**Description of Exit Project :-** For Navi Mumbai project it is required for quickly constructing the Flight Bridge (ROB) on the Dive Panvel Railway line and National Highway-4 so as to connect Survey no. 97 area 0-05-40 Hr. and Survey No. 99 area 0-32-60 Hr. which come under 12.5% plan area of land in Village-Taloja (Pachnand) and node at Village-Kharghar.

**Benefits to the Society :-** Due to the industrial importance and urbanization of Navi Mumbai city and development and expansion is Accelerated the community will not prosper unless the proposed area is acquired. Therefore, it is necessary to build a flight bridge to make travel faster and easier.

**Schedule – III**

**Reasons for displacing an infected person :- Nil**

**Schedule - IV**

**Summary of Social Impact Assessment :-** In view of the growth and expansion of the city of Navi Mumbai, if the flight bridge is constructed at Village Pendhar, Tal. Panvel it is necessary to construct a flight bridge (ROB) for the Navi Mumbai project Dive-Panvel Railway line and National Highway-4.


**Place : Panvel**
**Date : 30/06/2022**

**Sd/-**
**(Rahul Mundake)**
**Sub Divisional Officer Panvel**
**Sub Division Panvel**

## मोरपंखी गजल

### अे. के. शेख व प्रा. फातिमा मुजावर

मोरपंखी गजल हा मराठीतील तरही गजल संग्रह आहे. यातील मूळ गजला ज्येष्ठ गजलकार अे. के. शेख यांच्या असून त्यावर तरही गजला प्रा. फातिमा मुजावर यांच्या आहेत. ही गुरू शिष्याची जोडी हा नवा मराठी गजलमध्ये नवा प्रयोग करताना दिसत आहेत. जमीन म्हणून एक मिसरा घेवून आपली गजल निर्माण करायची मूळ गजलची नक्कल न करता वेगळी गजल तयार केली जाते, ती तरही गजल होय. तरही गजल हा प्रकार पुर्वापार आहे.



तरही म्हणजे तसेच किंवा त्याचप्रमाणे असाही अर्थ होतो. याबाबत विश्लेषण करताना भिमराव पांचाळे लिहितात, तरही गजल म्हणजे किसी और की खेतीमें अपनी फसल उगाना असेही म्हटले जाते. उर्दुमध्ये वृतांना जमीन असे संबाधले जाते. तरहीसाठी घेतलेला मिसरा ही गजलकारासाठी जमीनच असते, त्यावर आपले पीक घ्यायचे. बादशाही काळात लखनौ किंवा दिल्ली दरबारी मुशाहीयत तरही गझलांना रसिक दाद देत असत. कुणा एका ज्येष्ठ गजलकाराऱ्या एका मिसऱ्यावर म्हणजे ओळीवर इतरांनी तत्काळ आपली गजल लिहायची व सादर करायची हे खूप बौध्दीक व शिघ्र कवित्वाचे लक्षण मानले जात असे. हा ताजा माल असे. एक प्रकारे शायराला आपली लेखन कसोटी दाखवावी लागे. खुद्द गालीबनेही मीर सौदा यांच्या मिसऱ्यावरही तरही गजला केल्याचे उदाहरण आहे. लखनौ स्कूलची तरही गजल ही जरा शृंगारीक भडक असे हिला खारीजी गजल संबोधले जात असे. निदा फाजलीच्या एका संग्रहात सुमारे तीस उस्ताद गजलकारांच्या मिसऱ्यावर तरही गजला प्रसिध्द आहेत. एकाच सुपिक जमिनींवर विविध पिके यावीत तसे तरही गजलचे असते. काही लोक या प्रकाराला वाङमयीन दर्जा नसतो अशी ओरड करीत असले तरी ते खरे नाही. तरही गजल हे वाङमयीनचौर्य मानले जात नाही, कारण एकाच मिसऱ्यावर किंवा जमिनीवर अनेक गजला एकाच वृतात एकाच मीटरमध्ये सारखेच रदिफ काफीए घेवून शेर लिहिले जातात. तेव्हा विषयाची विविधता उपमा अंलकारांचे वेगळेपण अनेक काफीए ऐकायला मिळतात. व्यक्ती तितक्या प्रकृती हा खरा अनुभव तरही गजलेत येतो. गजलची मुळाक्षरे गिरवताना हा प्रकार खूप उपयुक ठरतो. या मोरपंखी गजल संग्रहात ८१ गजल आहेत. मूळ गजला अे. के. शेख यांच्या आहेत आणि तरही गजला प्रा. मुजावर यांच्या आहेत. ही तरही सुंदर जुगलबंदी आहे. तुला पाहिले की बरे वाटते, सदामिनी वृतातील ही गजल असून मूळ गजल आहे. तुला पाहिले की बरे वाटते, समाधान शांती मना लाभते ही मूळ गजल सखीला उद्देशून आहे. दुसऱ्या गजलेत पात्र बदलले आहे तरही गजल आहे ती नातीवर आहे इथे सखी नाही. तुला पाहिले की बरे वाटते, मला काय सर्वासही भावते. गुणाची अशी नात तू लाडकी घराण्यास आहे तशी साजते. यामधील सर्वच गजला सुंदर आहेत. काही ठिकाणी खयालोका टकरावही आढळतो, म्हणजे विचारांचा सारखेपणा दिसतो पण तरही गजलमध्ये ते अपरिहार्य असते. कारण काफीये मर्यादित असतात. त्यामुळे सारखेपणाचा दोषही मान्य करावा लागतो अशा ओळी या आढळतात. गजलमध्ये वक्रोती, विरोधाभास अशा अलंकारांचा वापर प्रामुख्याने केला जातो. मनमाडचे गजलकार खलील मोमीन म्हणतात गजल म्हणजे चटका देणे आणि नंतर बर्फाचा शेक देणे. गजलच्या या संग्रहात वाचकुना पूरेपूर प्रचिती येते.उपमा उपमाने ही वेगवेगळी रूपके यांची रेलचेल या दोन्ही गजलकारांनी केलेली आहे. भावभावनांचा संगम अनेक गजलात दिसून येतो. जीवनुभवाची अनुभूती रसिकांना येते. ही जुगलबंदी रंगतदार झालेली आहे यात शंका नाही. या संग्रहामुळे मराठी गजलमध्ये एक नवे पर्व सुरू होईल. नवीन गजलकारांना गजल लिहिण्यासाठी ते उपयुक्त ठरेल. वाचक रसिक यांना ही मेजवानी निश्चितच आवडेल.

# वाचन माणसाला समृध्द करते


**आपण जेव्हा वाचतो आणि सतत वाचत राहिलो तर आपल्या अस्तित्त्वामध्ये आमुलाग्र बदल होतात. वाचन माणसाला संस्कारीत बनविते. चांगले विचार माणसाला करायला वाचन भाग पाडत असते. वाचनाने माणसाच्या आतली कवाडं उघडली जातात. ही कवाडं बाहेरून आत उघडणारी-स्वागतशील अशी असतात. बाहेरून काहीतरी त्या दरवाजाने आत, मेंदूपर्यंत, मनापर्यंत-कदाचित आत्म्यापर्यंत येऊ शकतं. आता ही आत येणारी 'वस्तू' किती मौल्यवान आहे, किती अस्सल आहे यावर वाचनाचा आनंद अवलंबून असतो. तुमचे संस्कार जागृत होऊन नव्याने अविष्कृत होत असतील तर हे वाचन चिरस्मरणीय असेच होत असते. वाचन म्हणजे जणू स्वतःचा शोधच असतो आणि आत्मशोध ही अपरिहार्य अशी अन् बहुधा अंतिम अशी मनाची अवस्था आहे. माणसाला त्यामुळे, आज ना उद्या वाचनाकडे वळावे लागते. वाचन माणसाला समृद्ध करते. दिलासा देते-कदाचित जगणे सुसह्य करते. नामवंत साहित्यिकांकडून या उत्तम साहित्यकृतींची या सदरातून आपल्याला ओळख करून देत आहोत...**





डॉ. अविनाश पाटील, खांदा कॉलनी नवीन पनवेल

**वाचाल तर वाचाल**
**साहित्यिकांची आवडती पुस्तके**




## आठवणीतलं पनवेल -ॲड. सुनिता जोशी

सध्याच्या डिजीटल क्रांतीमुळे मोबाइल नावाचा अल्लाउद्दीनचा जादूचा दिवा कवी, लेखक, रसिकांच्या हाती सापडला आहे. फेसबुक हे एक माहितीचा खजिना खुला करणारे माध्यम यात जोडलेले अनेक ग्रुप माहितीची देवाण घेवाण करतात. आठवणीतलं पनवेल या ग्रुपवर हजारो पनवेलकरांनी आपल्या आठवणीना उजाला दिला. उज्वला पटवर्धन आणि सुनिता जोशी, मनोहर तळेकर, दत्तात्रेय जाधव यांचे या पुस्तकामागे मोठे श्रेय आहे. यापूर्वी ॲड. प्रार्थना सदावर्ते यांनी समग्र गाथा पनवेलची व पनवेल नगरपालिकेला १५० वर्षे झाल्याबाबत जी स्मरणिका प्रकाशित झाली, त्यांमध्ये बऱ्याच ऐतिहासिक बाबी आलेल्या आहेत. मग या पुस्तकात वेगळे काय आहे? यातील लेख हे व्यक्तीगत आहेत. काही वेळा पुनरावृतीही झाली आहे, परंतू संपादिकेने खुलासा केला आहे की, हे पुर्ण वेगळ्या प्रकारचे पुस्तक आहे हा इतिहास नाही त्यामुळे सनावळी, आकडेवारी वैगेरे काही नाही. या फक्त जुन्या आठवणी आहेत. या पुस्तकाची वर्गवारी एकूण अकरा प्रकरणात केलेली आहे १. भौगोलिक रस्ते, गल्ल्या, आळ्या ठिकाण, २. पनवेलमधील देवस्थाने, ३. गोकुळाष्टमी उत्सव-बापटवाडा, ४. शाळा आणि शाळेबद्दल, ५. व्यक्तीचित्र आणि व्यक्तीमत्वे, ६. खवय्ये पनवेलकर, ७. सामाजिक संस्था, ८. सांस्कृतिक पनवेल, ९. उद्योगधंदे, १०. काही आगळवेगळ, ११. पनवेल काल आज आणि उद्या अशा विषयाने माहितीचे संकलन केलेले आहे. यातील लेख पूर्ण प्रकरण स्वरूपाचे नाहीत. लहान मोठे लेख आहेत. बहुतेक व्यक्तीगत आठवणी आहेत. यातील बरेच बदल मी स्वतःही अनुभवले आहेत. दत्तात्रेय जाधव व मोहन तळेकर यांनी पनवेलच्या प्राचीन इतिहासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. पनवेलचे प्राचीन नाव पर्णवेली, पुण्यवेली पानवेल असे आढळते. आज ते पनवेल झाले आहे. गंमत म्हणजे आजही ग्रामीण भागात के रं के जेलता?(काय रे कुठे गेला होतास उतर येते पनवेली किंवा पनेली. आताच्या धुतपापेश्वर रूग्णालयाजवळ नाना फडणीसांची आठवी पत्नी रहात होती. तो बाइसाहेबांचा वाडा प्रसिध्द होता. बाळाजीपंत बापट पेशव्याचे सुभेदार म्हणून पनवेलीत आले. त्यांनी पनवेलमध्ये खूप सुधारणा केल्या. सात तलाव बांधले अशी खूप वेगवेगळी माहीती मिळत जाते. ही कुणा एकाने लिहिलेली नसल्याने यांचे स्वरूप विस्कळीत असे आहे. तरीही बरीच माहिती आठवणीच्या स्वरूपात आहे. त्यामुळे बऱ्याच आठवणीत सारखेपणाही आहे. विविध विषयांना हे पुस्तक स्पर्श करते. शहरीकरणामुळे लोकसंख्येचा प्रचंड लोंढा आला आणि पनवेलचे गावपण सुरू लागले. मात्र आज बऱ्याच सुधारणा पनवेलमध्ये झाल्या. सर्वाचा उल्लेख पुस्तकात आहे. शेवटी समारोपात संपादिकेने पुस्तकाचा सारा गोषवारा घेतला आहे. एक सुंदर पुस्तक वाचल्याचे समाधान हे पुस्तक देते. उज्वला पटवर्धन आणि मनोहर तळेकर, दत्तात्रेय जाधव, माधुरी थळकर, संतोष घोडींदे, गुणवंत पाटील, मिलींद गांगल इत्यादी व फेसबुवर आपल्या आठवणी लिहिणारे सारेच अभिनंदनास पात्र आहेत. आठवणींचा हा ऐवज पुस्तकरूपाने प्रसिध्द करून कै. एस. आर. जोशी मेमोरीयल ट्रस्टने व संपादिका सुनिता जोशी यांनी पनवेलचा जुना कालखंड नव्या पिढीला आपण उपलब्ध करून दिला आहे.

## इतिहास नवी मुंबईचा

### अमृत पाटील-नेरूळकर

नवी मुंबई हे नव्याने वसलेले शहर असले तरी त्याला त्याचा स्वतःचा इतिहास, भूगोल आहे. समृध्द असा सांस्कृतिक वारसा आहे. इतिहास नवी मुंबईचा या पुस्तकाचे सिध्दहस्त लेखक व नवी मुंबईचे भूमिपुत्र अमृत पाटील नेरूळकर यांनी दहा वर्षाच्या अथक परिश्रमाने संशोधनाने तो संकलीत करण्याचे महत्वाचे काम केलेले आहे. बाहेरून जे मराठी अमराठी लोक नव्याने इथे वसले आहेत त्यातील बहुतेक जणांना वाटते की, सिडकोने नवी मुंबई वसविली. त्यामुळे या नव्या वस्तीला काही इतिहास नाही, नव्या पिढीला व नव्या रहिवाशांना गावांचा इतिहास व संस्कृती, वारसा ठळकपणे अभ्यासपूर्ण सप्रमाण या ग्रंथात लेखकाने अधोरेखित केलेला आहे. अमृत पाटील नेरूळकर संगीताचा वारसा लाभलेले उमदे व्यक्तीमत्व आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात ते संगीत शिक्षक म्हणून काम करतात. आकाशवाणी, दुरदर्शनवर त्यांचे अनेक कार्यक्रम झालेले आहेत. कॅसेट, सीडी, माहितीपट, चित्रपट याद्वारे ३००हून अधिक गीते, ५१ कॅसेट, अल्बम प्रसिध्द झाले आहेत. या पुस्तकाचे साधारणपणे तीन भाग पडतात. नवी मुंबईचा प्राचीन इतिहास, प्राचीन जगाची माहितीचा भूगोल, प्रत्येक गावाचा विस्तृत इतिहास भूगोल, गावाची सांस्कृतिक पंरपरा, गावातील महत्वाची माणसे त्यांनी परिसराच्या विकासाला दिलेले योगदान अशा अनेक व्यक्तींची माहिती लेखकाने दिली आहे. शहाबाज, बेलापूर, नेरूळ, शिरवणे, ऐतिहासिक गाव धनसोली, कोपरखैरणे, कळवा, विटावा, मोत्यांचे गाव वाशी, जुई नगर इ. गावांची प्राचीन तशीच अर्वाचीन माहितीही लेखकाने अत्यंत अभ्यासपूर्ण आणि संशोधनाने संकलीत केली आहे.



लेखक आपली या पुस्तकामागील प्रेरणा स्पष्ट करताना लिहितो की, बेलापूर किल्ल्यात भटकंती सुरू असताना मला एक धातूचा तुकडा सापडला, तो व्यवस्थित न्याहाळला असता त्या धातूच्या तुकड्यावर काहीतरी अस्पष्ट अक्षरे असल्याचे जाणवले ती शिवमुद्रा होती. हा शुभ संकेत समजून या इतिहास लेखन कार्यास मी सुरूवात केली. १२ वर्षे हे काम सुरू होते. देवदेवळे, गड किल्ल्यांना भेटी देवून व गावोगावी जावून जुन्या जाणत्या मंडळीना भेटून गप्पा, मुलाखतीतून गतकाळाची माहिती घेतली. लोकगीते, आख्यायिका, कथा, दंतकथा ऐकल्या टिपणे काढली. यातून या पुस्तकाचे एकेक पान आकार घेऊ लागले. इतिकाराने संशोधकाने असेच असावे आपण पाहतो वि. का. राजवाडे किंवा रियासतकार सरदेसाई यांच्या सारख्या महान इतिहासकारांनी अशीच कष्टाने माहिती मिळविली. अमृत यांनी आपली नोकरी सांभाळून हे काम केले आहे. नवी मुंबईची पूर्वीची माहिती देताना साष्टी हीच लंका असल्याचे काही लेखकांचे प्र.श गुप्ते इ. दाखले दिले आहेत. नाला सोपारा (पुर्वीचा शुर्पारक-शुर्पनकेचा प्रदेश) उरणचा द्रोणागिरी, ज्या महिकावती देवीचा उल्लेख रामायणात येतो. ती केळवे माहिमची देवी. सात कोकण म्हणजेच सप्त पाताळ इ. आता हनुमंताच्या जन्माच्या ठिकाणावरूनही वाद सुरू आहेत. लेखकाने यावर जास्तची चर्चा न करता नुसती एक झलक दिली आहे. त्याचा खरा उद्देश नवी मुंबई बेलापूर पट्टीतील गावांची माहिती जूनानवा इतिहास उजेडात आणणे हा आहे. नवीन मुंबईतील प्रत्येक गावांचा विस्तृत इतिहास त्याची माहिती या पुस्तकात आहे. आधुनिक काळातील माहितीत दि. बा. पाटील यांच्या चळवळी, नवी मुंबई महानगरपालिका, आगरी कोळी समाज भवनाचे बांधकाम अशी सविस्तर माहिती लेखकाने दिली आहे. हे माहितीचे ऐतिहासिक दस्ताऐवज असल्याने ते साहित्यिक निकषापासून मुक्त आहे. हे संशोधन नवी मुंबईतील पुढच्या पिढ्यांना माहितीपूर्ण ठरेल, अभ्यासकांना उपयुक्त होईल यात शंका नाही.

# सारसोळे येथे सीबीएसई शाळा होणार सुरू

## भाजप नगरसेवक सुरज पाटील यांच्या प्रयत्नांना यश




**नवी मुंबई : प्रतिनिधी, वार्ताहर**

सारसोळे येथे नवी मुंबई महापालिकेची सीबीएसई शाळा चालू शैक्षणिक वर्षात सुरू करण्यास नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी हिरवा कंदील दिला आहे. या शाळेसाठी भाजपचे स्थानिक नगरसेवक सुरज पाटील यांनी पाठपुरावा केला होता.

आता नेरूळमधील सीबीएसई बोर्डाच्या शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या, गरजू मुलांना निशुल्क आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार असल्याने सारसोळे, नेरूळ परीसरातील पालकांनी आनंद व्यक्त केला आहे. नवी मुंबईतील कुकशेत गावामध्ये २०१२ साली इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करून नेरूळमधील मध्यवर्ती असलेल्या सारसोळे ठिकाणी आता सीबीएसई हायस्कूल सुरू करून भाजपचे स्थानिक नगरसेवक सुरज पाटील यांनी गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतुन गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शिक्षण क्षेत्रात केलेला भगीरथ प्रयत्न यशस्वी झाला आहे. सन २०२२-२३ या चालू शैक्षणिक वर्षात सारसोळे, नेरूळमध्ये सीबीएसई शाळा सुरू करण्यास त्वरित मान्यता दिल्याने सुरज पाटील यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्त बांगर यांचे आभार मानले आहेत.

नगरसेवक सुरज पाटील यांनी बेलापूर विधानसभा मतदारसंघातील कुकशेतमध्ये पहिली इंग्रजी माध्यमाची शाळा २०१२मध्ये सुरु करून गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण घेण्याची प्रवेशद्वार खुली करून दिली. आता चालू शैक्षणिक वर्षात नेरूळ क्षेत्र २ मधील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या सारसोले-नेरूळमध्ये सीबीएसई शाळा सुरू होणार आहे.

नवी मुंबई महापालिका सीबीएसई शाळा एफएसएमपीटी तत्वावर खासगी संस्थेमार्फत चालवणार आहे. यासाठी नवी मुंबई मनपा शाळेच्या शिक्षक व



शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वेतनापोटी येणाऱ्या एकूण खर्चापेकी ५५ टक्के खर्चाचा हिस्सा संबंधित संस्थेस देणार आहे तर उर्वरित ४५ टक्के खर्च संस्था स्वतः करणार आहे. नेरूळमधील नवी मुंबई महापालिका प्राथमिक शाळा क्र. १२ सेक्टर ६ सारसोळे या सोबत त्याच ठिकाणी नवीन सीबीएसई बोर्डाची शाळा क्र. ९८ नर्सरी ते इयत्ता दहावीपर्यंत निविदा प्रक्रिया पुर्ण करुन चालू शैक्षणिक वर्षांपासून सुरू होणार आहे. हे ठिकाण नेरूळ क्षेत्र २ आणि ३ मधील मध्यवर्ती असून सारसोळे गाव, नेरूळ सेक्टर ६, ८, १०, १४, १६, १६अे, १८, १८ अे, २, ४, २०, २२, २४, कुकशेत गाव, नेरूळ गाव या ठिकाणी राहण्यास असणाऱ्या पालकांना आपल्या पाल्यास शाळेत घालणे सुलभ होणार आहे.

माजी नगरसेवक सुरज पाटील यांनी आपल्या प्रभागातील गटर, मीटर आणि वॉटर याच्या पलिकडे जाऊन नवी मुंबई मनपा प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून लोकनेते गणेश नाईक यांच्या माध्यमातून २०१२ साली बेलापूर विधानसभा मतदारसंघात मनपाची पहिली इंग्रजी माध्यमाची शाळा गोरगरिबांच्या मुलांसाठी सुरु करुन आपली शिक्षण क्षेत्रातील आवड दाखवून दिली होती. सारसोळे गावातील ग्रामस्थांचा विश्वास प्राप्त करून सीबीएसई माध्यमाची शाळा मनपाकडे सातत्याने पाठपुरावा करत मंजूर करून घेतली आणि भगीरथ प्रयत्न करून शिक्षणाची ज्ञानगंगा सर्वसामान्यांच्या घरी पोहचवली. लोकनेते गणेश नाईक यांच्या माध्यमातून आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे सारसोळे नेरुळ येथे सीबीएसई शाळा सुरु करण्यास स्थानिक नगरसेवक सुरज पाटील यांच्या प्रयत्नास यश आले आहे.

# शिक्षक पतपेढी निवडणुकीत 'परिवर्तन'

**खारघर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पनवेलसह उर्वरित १४ तालुक्यात ९८ वर्षे जुनी व सर्वांत मोठ्या पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे सर्व २१ उमेदवार विजयी झाले आहेत. २०० कोटींची उलाढाल असलेल्या पतपेढीच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

मागील सात वर्षे कार्यभार सांभाळणारे सत्ताधारी पॅनल आणि त्यांच्याविरोधात परिवर्तन पॅनल अशा दोन गटांत निवडणूक झाली. पतपेढीचे एकूण मतदार तीन हजार ११९ इतके असून तीन हजार ३२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

सोपान चांदे, विनोद जोशी, आनंद पाटील, मोहन पाटील, रवींद्र पाटील, विठोबा पाटील, विज्ञान पाटील, कृष्णा पिंगळा, सुभाष बुंधाटे, कैलास भोईर, मोहन भोईर, वसंत मोकल, अरविंद मोरे, संदीप म्हात्रे, हितेंद्र म्हात्रे, महेंद्र शिर्के, जगदिश म्हात्रे, जीवन तेलंगे, संदीप पाटील, उज्वला कनोजे, सुमित्रा खेडेकर अशी विजयी उमेदवारांची नावे आहेत. परिवर्तन पॅनलचे प्रमुख म्हणून राजा म्हात्रे, सोपान चांदे, जगदिश म्हात्रे, देवानंद पिंगळे, रोशन तांडेल, भगवान घरत, प्रमोद पाटील, शंकर पाटील, अमरचंद्र पाटील, विनोद कडव, अ. झी. ठाकूर, जयश्री म्हात्रे यांनी काम पाहिले. पेण प्राथमिक शिक्षक पतपेढीत पनवेलमधील शिक्षक देखील मोठ्या संख्यने असून पनवेल महापालिका, जिल्हा परिषद शाळांमधील ५१४ शिक्षकांनी मतदानाचा हक्क बजावला.

**आमच्यावर शिक्षकांनी टाकलेला विश्वास आम्ही पुढील पाच वर्षांत सार्थ ठरवून शिक्षकांचे हित जोपासण्याचा काम आम्ही प्रामाणिकपणे करीत राहू.**

**-विनोद जोशी, विजयी शिक्षक उमेदवार**



# नवी मुंबईत भाजपतर्फे डॉक्टर्सचा सन्मान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोरोनाच्या संकटकाळात कोरोना योद्धे म्हणून सदैव तत्पर असणाऱ्या नवी मुंबईतील डॉक्टर्स आणि वैद्यकीय क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्याना गुणिजनांचा भारतीय जनता पक्ष, प्रभाग क्र ३२, शिरवणे गाव नेरुळ सेक्टर १, शिवाजी नगर यांच्या विद्यमाने १ जुलै राष्ट्रीय डॉक्टर दिन निमित्त डॉक्टरना त्याच्या कार्यक्षेत्रात भेट देऊन माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी सन्मानित केले.



या वेळी माधुरी सुतार यांच्या समवेत कुमुद पाटील, रंजीता घरत, अनिता पाटील, सायली चांदे, सीमा रिडवाल, संदीप पाटील आदी भाजप कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रीय डॉक्टर्स दिनाच्या निमित्ताने डॉक्टरांचा सन्मान केल्याने त्यांनी आनंद व्यक्त केला.

# ज्ञानमंदिर विद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात

**कळंबोली : प्रतिनिधी**

म. ए .सो. ज्ञानमंदिर विद्यालयात शुक्रवारी (दि. १) शाळेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा झाला.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेने ठरविलेल्या शैक्षणिक ध्येय धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व दिले आहे. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून शाळेने समाजोपयोगी कोविड १९ लसीकरणासारख्या उपक्रमांचे व शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करून हे रौप्य महोत्सवी वर्ष उत्साहात साजरे केले. या वर्धापन दिनाचे



औचित्य साधून एका खास कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रगती ज्वेलर्सचे मालक, कळंबोली व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष, पनवेल महानगरपालिका व्यापारी असोसिएशनचे संयोजक कमल कोठारी आणि उद्योजक मनीष तिवारी पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका प्रियंका फडके, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका संजना बाईत, माजी विद्यार्थी केतन बाणे, पालक प्रतिनिधी छाया बोराटे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रोहिणी गायकवाड यांनी केले. शाळेचे महामात्र गोविंद कुलकर्णी यांना डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल त्यांचे विद्यालयातर्फे अभिनंदन केले.

शेवटी पाहुण्यांनी दिलेल्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले व विद्यार्थ्यांची दिंडी संपूर्ण शाळेच्या परिसरात काढण्यात आली. सूत्रसंचालन शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका दिपाली कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमासाठी शाळा समिती अध्यक्ष देवदत्त भिशीकर आणि महामात्र डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले होते.

# ताम्हिणी घाटातील प्रवास असुरक्षित

## ▮ पावसाळ्यात पुणे-माणगाव मार्गावर प्रवाशांचा जीव टांगणीला


**माणगाव : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय दिघी बंदराशी जोडणाऱ्या माणगाव-ताम्हाणी-पुणे मार्गावरील ताम्हिणी घाटाच्या संरक्षक भिंती धोकादायक झाल्या आहेत. तसेच या मार्गावर दरडी कोसळण्याची भीती प्रवाशांतून व्यक्त करण्यात येत आहे. मात्र त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.

पुणे-दिघी या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम खात्याने १९९८-९९ मध्ये केले होते. त्यावेळी काही ठिकाणी संरक्षक भिंतीचे काम डबर सिमेंटमध्ये करण्यात आले होते. या संरक्षक भिंती आता कमकुवत झाल्या आहेत. या रस्त्याच्या एका बाजूला डोंगर तर दूसऱ्या बाजूला खोल दऱ्या आहेत, त्यातच हा मार्ग अरुंद आहे. त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनचालकांना धोका जाणवत आहे. काही ठिकाणी अवघड वळणांवर संरक्षणासाठी पत्र्याचे कवच उभारले आहेत. तर काही ठिकाणी अवघड वळणांवर कोणत्याही प्रकारचे संरक्षणासाठी बांधकाम करण्यात आलेले नाही. त्यामुळे हा रस्ता अपघाताला निमंत्रण देत आहे. ताम्हिणी घाटाच्या पायथ्याशी सणसवाडी गावाच्या हद्दीपासून १० ते १२किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर ज्या ठिकाणी अवघड वळणे आहेत, त्या ठिकाणी संरक्षक भिंती बांधणे आवश्यक आहे. मात्र काही ठिकाणी संरक्षक भिंतीचा अभाव असल्याने वाहन चालकांना तेथील खोल दऱ्यांचा धोका संभवत असतो.

ताम्हिणी घाटातील निसर्गरम्य धबधबे तसेच भिरा येथील देवकुंड हे पर्यटक व ट्रेकर यांचे प्रमुख आकर्षण झाले आहे. त्यामुळे पर्यटक या घाटामध्ये थांबून निसर्गरम्य परिसराचे दर्शन घेऊनच पुढील प्रवास करत असतात. सुट्टीच्या कालावधीमध्ये पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होते. रस्त्याकडेला उंच डोंगर असल्याने पावसाळ्यात दरडी कोसळण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे प्रवाशांना या मार्गावरून प्रवास करताना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो.

ताम्हिणी घाटात ज्या ठिकाणी दरडी कोसळण्याची शक्यता आहे, तेथे संरक्षक भिंती उभाराव्यात. व कमकुवत झालेले संरक्षण कठडे नव्याने बांधावेत, अशी मागणी नागरिक, प्रवासी व पर्यटकातून होत आहे.



(छाया : सलीम शेख)

### दरडींच्या घटनांमुळे प्रवास धोकादायक!

माणगाव-ताम्हाणी-पुणे मार्गावरील ताम्हिणी घाटात पावसाळ्यात दरडी कोसळण्याची भीती आहे. जोरदार पावसात दरडी कोसळून दुघर्टना, अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही दिवसांपूर्वी वरंध घाटात दरड कोसळून एक जण जखमी झालेला आहे. त्यामुळे हा घाट तीन महिन्यांसाठी अवजड वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. ताम्हिणी घाटातही दरडींचा धोका असल्याने प्रवास धोकादायक बनला असल्याचे चित्र आहे.



## अलिबागमध्ये भाजपचा विजयी जल्लोष

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील महाविकास आघाडी सरकार पडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार स्थापन झाल्याबद्दल भारतीय जनता पक्षाच्या अलिबाग येथील रायगड जिल्हा कार्यालयासमोर येथे शनिवारी (दि. २) विजयी जल्लोष करण्यात आला.

भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अ‍ॅड. महेश मोहिते, अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, शहर अध्यक्ष अ‍ॅड. अंकित बंगेरा, सतीश लेले, ओबीसी सेल जिल्हा अध्यक्ष जगदीश घरत यांच्यासह तालुक्यातील सर्व जिल्हा, तालुका पदाधिकारी, सर्व मोर्चा, सेल, प्रकोष्ठचे पदाधिकारी आणि सर्व शक्ती केंद्र प्रमुख, बुथ अध्यक्ष या वेळी उपस्थित होते.

## शिहू येथील शिबिरात ५० जणांचे रक्तदान

**नागोठणे : प्रतिनिधी**

डॉक्टर्स डेचे औचित्य साधून रोहा तालुका मेडिकल चॅरिटेबल ट्रस्ट आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यामने शिहू येथील डॉ. भोईर यांच्या निवासस्थानी रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ५० जणांनी रक्तदान केले.

या वेळी डॉ. रोहिदास शेळके, डॉ. राजेंद्र धात्रक, डॉ. सुनील पाटील, डॉ. पुरुषोत्तम भोईर, प्रसाद भोईर, लक्ष्मण खाडे, अजिंक्य पाटील, संजय भोईर, दर्शना जवके, विशाल दिवेकर, नरेश पाटील, प्रणाली पाटील, के. के कुथे, विजय पाटील, दामोदर भोईर, जिल्हा रक्तपेढीच्या डॉ. सारिका बिडये, डॉ. दीक्षा तोडणकर, उपस्थित होते.



(छाया : राज वैशंपायन)

## 'कर्जतची भौगोलिक परिस्थिती विविध पिके घेण्यास योग्य'

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका मुंबईच्या जवळ आहे. शेती उत्पादनासाठी बाजारपेठ जवळ आहे. कर्जत तालुक्यातील बऱ्याचशा भागात उन्हाळी पिके घेण्यासाठी पाणीही उपलब्ध आहे, पण हल्ली युवक शेती करण्यासाठी पुढे येत नाहीत. त्यांनी यामध्ये लक्ष घातल्यास रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. जमिनी विकण्यापेक्षा त्यातून विविध पिके कशी घेता येतील याकडे आपण सर्वांनी पाहिले पाहिजे. आपल्या तालुक्यातून आदिवासी ग्रामस्थ दररोज तुळशी घेऊन दादरच्या फुल बाजारात जातात. त्याचप्रमाणे अन्य पिकेही थेट बाजारात घेऊन जाणे परवडणारे आहे कारण तालुक्याची भौगोलिक परिस्थिती त्या योग्य आहे, असे महत्वपूर्ण प्रतिपादन तहसीलदार विक्रम देशमुख यांनी येथे केले.

रायगड प्रेस क्लब संचलित कर्जत प्रेस क्लबच्या वतीने कृषी दिनाचे औचित्य साधून 'शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सन्मान' या संकल्पनेतून आदर्श शेतकरी पुरस्काराचे आयोजन वदप येथील श्री मारुती मंदिराच्या सभागृहात करण्यात आले होते. तहसीलदार विक्रम देशमुख यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले होते. याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे, पंचायत समितीचे कृषी अधिकारी चिंतामण लोहकरे, प्रदेशिक कृषी केंद्राचे विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, जेष्ठ शेतकरी विठ्ठल शिंदे, सल्लागार विजय मांडे उपस्थित होते.

कार्याध्यक्ष श्रीकांत हाबळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्ष अ‍ॅड. राहुल देशमुख यांनी प्रास्ताविकात उपक्रमाचा उद्देश सांगितला. त्यानंतर अ‍ॅड. अजित विठ्ठल पाटील, वदप आणि हेमंत नामदेव कोंडीलकर यांना मान्यवरांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह, तुळशीचे रोप देऊन आदर्श शेतकरी पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पाटील आणि कोंडीलकर यांनी आपल्या मनोगतातून शेतीतील नवनवीन प्रयोग केल्यानंतरचे अनुभव कथन केले. प्रगतशील निलिकेश दळवी यांनी, तरुणांनी शेती व्यवसायात उतरल्यास विविध प्रयोग करून शेती व्यवसायात आमूलाग्र बदल होऊ शकतो. असे स्पष्ट केले.

कृषी अधिकारी शेवाळे आणि लोहकरे यांनी शासकीय योजना सांगून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा. तसेच ड्रीम सिडर आणि एस आर टी ची अवजारे वापरा त्यांच्यावर शासनाकडून ५० टक्के अनुदान मिळते. त्याचा लाभ घ्या, असे आवाहन केले. डॉ. मर्दाने यांनी, भात हे आपल्या जेवणातील मुख्य अन्न आहे. प्रादेशिक कृषी केंद्रात विविध भाताच्या जाती विकसित केल्या जतात. त्यांचे पीक घेतल्यास उत्पन्नात निश्चित वाढ होईल असे सांगितले. सूत्रसंचालन विलास श्रीखंडे यांनी केले. आभार भूषण प्रधान यांनी मानले.

कृषी विस्तार अधिकारी अभिजीत खैरे, देविदास राठोड, प्रगतशील शेतकरी यशवंत गायकवाड, नैनेश दळवी, रमेश चव्हाण, दशरथ मुने, अनिल देशमुख, खंडू शिंदे, भगवान चव्हाण, जगदीश पाटील, कृष्णा चव्हाण, जानू मराडे, श्रीकांत पोटील, परम पाटील, अजय गायकवाड, मल्हार पवार, ज्ञानेश्वर बागडे, गणेश पवार, गणेश मते, गणेश पुरवंत, समीर एरूणकर यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## खोपोलीत दाखले वाटप शिबिरास प्रतिसाद

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीचे प्रथम नगराध्यक्ष कै. गो. पु. तन्ना यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून कै. गो. पु. तन्नाशेठ मित्र परिवार, केटीएसपी मंडळ आणि खालापूर तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. ३०) खोपोलीतील केएमसी महाविद्यालयात विविध दाखले वाटप शिबिर घेण्यात आले. त्यात विविध प्रकारच्या एकूण ५९६ दाखल्यांचे वाटप करण्यात आले.



(छाया : अरुणा नलावडे)

अभय तन्ना यांनी मान्यवरांचे स्वागत केले. तहसीलदार आयुब तांबोळी, माजी नगराध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात दाखले वाटप करण्यात आले. दिवसभरात १५ ज्येष्ठ नागरिक दाखले, १५० अधिवास (डोमिसाईल) दाखले, ४३१ उत्पन्नाचे दाखले देण्यात आले. तसेच जात प्रमाणपत्रासाठी ७२ अर्ज व नॉनक्रिमिलेअर दाखल्यासाठी आठ अर्ज स्वीकारण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र घोडकेसर यांनी केले. या वेळी केटीएसपी मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाह किशोर पाटील, माजी नगरसेवक मोहन औसरमल व माजी नगरसेविका केविना गायकवाड यांच्यासह महसूल कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

## वडवली येथील अपंग विद्यार्थ्याला व्हीलचेअर

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील वडवली गावातील यश ज्ञानेश्वर लदगे हा विद्यार्थी बहुविकलांग आहे. त्याला शाळेत जाण्यासाठी नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्टकडून व्हीलचेअर भेट देण्यात आली.

वडवली येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी यश ज्ञानेश्वर लदगे (वय ७) बहुविकलांग आहे. त्याला शाळेत येण्यासाठी व्हीलचेअर मिळावी, या करिता माणगाव तर्फे वरेडी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले यांनी नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्टकडे पाठपुरावा केला. साई ट्रस्टच्या संचालिका राधिका घुले यांच्या हस्ते नुकताच यश लदगे याला व्हीलचेअर सुपूर्द करण्यात आली. या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अभय लदगे, सदस्य अशोक तळपे, पालक ध्यानेश्वर लदगे, नेत्रा लदगे, शाळेचे मुख्याध्यापक जालिंदर पाचपुते, शिक्षिका गायत्री गांजाळे आदी उपस्थित होते.

## खोपोलीत साहित्यिक वारकरी दिंडीचे स्वागत




(छाया : विनायक माडये)

**खोपोली : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप)च्या वतीने उरणहून निघालेल्या साहित्यिक वारकरी दिंडीचे शनिवारी (दि. २) खोपोलीत आगमन झाले. शहरातील गगनगिरी महाराजांच्या आश्रमात कोमसापच्या खोपोली शाखेतर्फे या दिंडीचे स्वागत करण्यात आले.

कोमसापच्या खोपोली शाखेच्या अध्यक्षा उज्ज्वला दिघे, उपाध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये, कार्याध्यक्ष नरेंद्र हर्डीकर, कोषाध्यक्ष वामनराव दिघे यांनी या साहित्यिक वारकरी दिंडीचे स्वागत केले. प.पू. गगनगिरी महाराजांच्या मठातर्फेही दिंडीचे स्वागत केले गेले. त्यानंतर भक्तीपर अभंग, गाणी सादर करण्यात आली. होळकर सर, मच्छिंद्र म्हात्रे, एल. बी. पाटील यांनी भजने सादर केली.

खोपोली कोमसापच्या वतीने नरेंद्र हर्डीकर, प्रकाश राजोपाध्ये, डॉ. सुभाष कटकदौंड,संतोष वाघ, प्रकाश सोनवणे, रेखा कोरे, उज्ज्वला दिघे, जयश्री पोळ, सताणे सर यांनी काव्यपुष्पे सादर केली. त्यानंतर ही साहित्यिक वारकरी दिंडी पंढरीला मार्गस्थ झाली.

## पाऊस पडल्याने दुबार पेरणीचे संकट टळले

### कर्जत तालुक्यात भातपिकासाठी वातावरण अनुकूल

**कर्जत : बातमीदार**

सुरुवातीपासून हुलकावण्या देणाऱ्या पावसाने जून महिन्याच्या अखेरीस दमदार सुरुवात केल्याने कर्जत तालुक्यातील बळीराजा सुखावला आहे. भाताची रोपे तयार होण्यासाठी आवश्यक असा पाऊस सध्या होत असल्याने शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त झाले आहेत. दरम्यान, भातशेतीसाठी गरजेचे असलेली पाणी शेतात दिसू लागल्याने बळीराजा समाधानी आहे.



(छाया : संतोष पेरणे)

| |
|---|
| २०२१मधील एकूण पाऊस - ३३९७ मिलिमीटर |
| आजच्या तारखेपर्यंत २०२१मध्ये ८३९ मिलिमीटर |
| या वर्षीचा सरासरी पाऊस - २७९ मिलिमीटर |
| या वर्षीचा सर्वाधिक पाऊस -५१ मिलिमीटर |

कर्जत तालुक्यात सुमारे ९६०० हेक्टर जमिनीवर भातशेती केली जाते. तालुक्याच्या काही भागात उन्हाळी भातशेतीही केली जाते. दरवर्षी जून महिन्यात सात तारखेला पाऊस सुरू होतो. यंदा जून महिन्याच्या १० तारखेनंतर कर्जत तालुक्यात पावसाने हजेरी लावली होती. यंदा चांगला पाऊस होणार, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला होता. त्यातच दिवसातून एकद-दुसरी हलक्या पावसाची सर येत असल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी भाताची पेरणी केली होती. भात रोपे वाढू लागली होती. दरम्यान, पावसाने दडी मारल्याने भात रोपे वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू होती. जून महिना संपत आला तरी पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले होते. काही शेतकरी भात रोपे वाचविण्यासाठी ओढ्यावर पंप बसवून शेतात पाणी घेत होते. मात्र जून महिन्याच्या अखेरीस कर्जत तालुक्यात मोसमी पावसाने दमदार सुरुवात केल्याने बळीराजा सुखावला आहे.

कर्जत तालुक्याच्या बहुतांशी भागात मागील तीन दिवस साधारण ४५ मिलीमीटर पाऊस होत आहे. त्यामुळे भाताची रोपे सुकण्याची स्थिती निर्माण झाली होती, ती दूर झाली असून बळीराजाची शेतीच्या कामांची लगबग वाढली आहे.



## पेणमध्ये अपंगांना प्रमाणपत्र वाटप

**पेण : प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालय-अलिबाग व उपजिल्हा रुग्णालय-पेण यांच्या संयुक्त विद्यमाने पेण उपजिल्हा रुग्णालयात अपंग विकलांग व प्रमाणपत्र वितरण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार यांनी शिबिराचे उद्घाटन केले. या शिबिरात एकूण ५५ अस्थिव्यंग, २२ नेत्र व बालरोग लाभार्थी सहभागी झाले होते. त्या सर्वांना तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांच्या हस्ते व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजीव तांबाळे यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

जिल्हा सामान्य रुग्णालयाचे डॉ. गौतम देसाई, डॉ.शिरसागर, डॉ. अजय इंगळे, डॉ. आशिष मिश्रा, डॉ. पावसकर तसेच सुशील साईकर, अक्षय गोरे, प्रीतम सुतार, हितेश जाधव, संतोष पाटील, भूषण कडू आदिंसह पेण उपजिल्हा रुग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते.




(छाया : अनिस मनियार)

# पंतनंतर जडेजाचे धडाकेबाज शतक

## इंग्लंडविरुद्ध कसोटीत भारत पहिल्या डावात चारशेपार

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंडदरम्यानच्या अर्धवट राहिलेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील शेवटचा सामना बर्मिंगहॅममधील एजबस्टन क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जात आहे. या सामन्यातील पहिल्या डावात भारताच्या आघाडीच्या फलंदाजांनी पहिल्या दिवशीच्या खेळात निराशा केल्यानंतर उपकर्णधार ऋषभ पंतने शतक ठोकून डाव सावरला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी अष्टपैलू रवींद्र जडेजानेही धडाकेबाज खेळी केली. त्यामुळे भारताची धावसंख्या चारशेपार गेली.



भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने कसोटीच्या दुसऱ्या दिवशी शानदार शतक झळकावून इतिहास रचला. जडेजाने १८३ चेंडूंत १३ चौकारांच्या मदतीने आपले शतक पूर्ण केले. त्याचे हे कसोटी कारकिर्दीतील तिसरे आणि परदेशी भूमीवरील पहिले शतक ठरले आहे. शतक पूर्ण केल्यानंतर त्याला जास्त काळ मैदानावरती थांबता आले नाही. जेम्स अँडरसनने त्याला त्रिफळाचित करून तंबूत माघारी धाडले.

दुसऱ्या दिवशी जडेजा व मोहम्मद शमी यांनी दमदार खेळ करताना सुरेख फटके मारले. ७० चेंडूंत ४८ धावांची ही भागीदारी स्टुअर्ट ब्रॉडने संपुष्टात आणली. शमी (१६) ची विकेट घेत ब्रॉडने कसोटीत ५५०वा बळी टिपला. त्यानंतर जडेजाची विकेट पडली. जेम्स अँडरसनने भन्नाट यॉर्कर टाकून ही विकेट मिळवली. जडेजा १९४ चेंडूंत १३ चौकारांसह १०४ धावांवर बाद झाला.

भारताचा पहिला डाव ४१६ धावांवर संपुष्टात आला. जसप्रीत बुमराहने १६ चेंडूंत चार चौकार व दोन षटकारांसह नाबाद ३१ धावा कुटल्या. इंग्लंडकडून अँडरसनने ६० धावा देताना ५ विकेट्स घेतल्या.

### कर्णधार बुमराहने एकाच षटकात चोपल्या ३५ धावा; रचला विश्वविक्रम



भारताचा स्फोटक फलंदाज युवराज सिंगने २००७ साली इंग्लंडचा वेगवान गोलंदाज स्टुअर्ट ब्रॉडला सहा चेंडूंमध्ये सहा षटकार लगावले होते. एका षटकात ३६ धावा करण्याचा पराक्रम युवराजने केला होता. असाच काहीसा पराक्रम शनिवारी इंग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे सुरू असणाऱ्या पाचव्या कसोटीमध्ये पहायला मिळाला. ऋषभ पंत आणि रविंद्र जाडेजाने पहिला दिवस गाजवल्यानंतर दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रामध्ये भारताचा कर्णधार जसप्रीत बुमराहने फलंदाजी करताना केलेली भन्नाट कामगिरी चर्चेचा विषय ठरली. सामन्यातील ८४ आणि दुसऱ्या दिवसातील ११ व्या षटकामध्ये बुमराहने स्टुअर्ट ब्रॉडची जबरदस्त धुलाई केली. एक वाइड आणि एका नो बॉलच्या जोरावर बुमराहने या षटकामध्ये तब्बल ३५ धावा कुटल्या. या षटकामधील शेवटचा चेंडू वगळता प्रत्येक चेंडू बुमराहने सीमेपार धाडला. बुमराहची ही विक्रमी कामगिरी ठरली.

**मलेशिया बॅडमिंटन स्पर्धा**

# सिंधू, प्रणॉयचे आव्हान संपुष्टात




**क्वालालम्पूर : वृत्तसंस्था**

दोन ऑलिम्पिक पदक विजेत्या पी.व्ही. सिंधूचे मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतील आव्हान शुक्रवारी संपुष्टात आले. चायनीज तैपेईच्या ताय झू यिंगकडून तीन गेममधील संघर्षानंतर सिंधूने पराभव पत्करला. याचप्रमाणे थॉमस चषकातील भारताच्या जेतेपदाचा शिलेदार एचएस प्रणॉयची वाटचालसुद्धा संपुष्टात आली.

महिला एकेरीत सातव्या मानांकित सिंधूने टोकियो ऑलिम्पिकमधील रौप्यपदक विजेत्या द्वितीय मानांकित ताय झूविरुद्धचा सामना २१-१३, १५-२१, १३-२१ असा गमावला. या सामन्यानंतर ताय झू हिने सिंधूविरुद्धचे विजयी वर्चस्व १६-५ असे राखले आहे. सिंधूने ताय झूविरुद्ध सलग सहाव्या सामन्यात पराभव पत्करला.

पुरुष एकेरीत जागतिक क्रमवारीत आठव्या क्रमांकावरील जोनाटन ख्रिस्टीने प्रणॉयला २१-१८, २१-१६ असे नामोहरम केले.

## पंतच्या शतकानंतर प्रशिक्षक द्रविडचे बाहुबली सेलिब्रेशन



**लंडन : वृत्तसंस्था**

एजबॅस्टन येथे खेळल्या जात असलेल्या भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटीच्या पहिल्या दिवशी भारतीय यष्टीरक्षक ऋषभ पंतने शानदार फलंदाजी केली. पंतने कसोटी कारकिर्दीतील पाचवे शतक पूर्ण केले. पंतच्या शतकानंतर प्रशिक्षक राहुल द्रविडने ज्या पदतीने सेलिब्रेशन केले चाहते थक्क झाले. सोशल मीडियावर हा व्हिडीओ व्हायरल होत आहेत.

पंतने आपल्या खेळीने प्रशिक्षकांचे मन जिंकले. स्टुअर्ट ब्रॉडच्या चेंडूवर दोन धावा काढून पंतने शतक पूर्ण केले. अशा स्थितीत एजबॅस्टनच्या बाल्कनीत बसलेला प्रशिक्षक द्रविड उभा राहिला आणि दोन्ही हात वर करून बाहुबली सेलिब्रेशन करताना दिसला.

इंग्लंड दौऱ्यावर चार वर्षांपूर्वी ओव्हलच्या मैदानावर पहिले कसोटी शतक झळकाविले होते. त्याने आतापर्यंत पाच शतके झळकावली असून त्यापैकी चार विदेशी मैदानावर झळकाविली आहेत. पंतने सिडनीमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध नाबाद १५९, अहमदाबादमध्ये इंग्लंडविरुद्ध १०१, दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवर या वर्षी नाबाद १०० आणि नंतर एजबॅस्टन येथे पहिल्या डावात १४६ धावा केल्या आहेत. याआधी पंतने २०१८मध्ये ओव्हलवर शतक झळकाविले होते.

## भारताविरुद्ध अँडरसनचे मायदेशात बळींचे शतक

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान सुरू असलेल्या कसोटी सामन्यात इंग्लंडचा गोलंदाज जेम्स अँडरसनने मायदेशात भारताविरुद्ध १०० कसोटी बळी घेण्याची कामगिरी केली.

वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसनने सातव्या षटकात शुबमन गिलला आणि त्यानंतर चेतेश्वर पुजाराला बाद केले. गिलला बाद केल्यानंतर जेम्सने एक खास विक्रम आपल्या नावावर केला. त्याचे इंग्लंडमध्ये भारताविरुद्ध १०० कसोटी बळी पूर्ण झाले. जेम्स अँडरसनला इंग्लंडच्या कसोटी गोलंदाजीचा कणा समजले जाते. त्याने वेळोवेळी आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करून संघाची मदत केलेली आहे. शेवटच्या व निर्णायक कसोटी सामन्यात अँडरसनने पहिला बळी घेताच मायदेशात भारताविरुद्ध १०० बळींचा टप्पा ओलांडला. अशी कामगिरी करणारा तो इंग्लंडचा पहिला गोलंदाज ठरला.

# विम्बल्डन टेनिस स्पर्धेत जोकोव्हिच, जाबेऊरची आगेकूच

**लंडन : वृत्तसंस्था**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत पुरुषांच्या गटात अग्रमानांकित नोव्हाक जोकोव्हिच, टॉमी पॉल आणि डेव्हिट गॉफिन यांनी आगेकूच केली, तर महिला एकेरीत तृतीय मानांकित ओन्स जाबेऊर, एलिस मेर्टेन्स आणि तात्जाना मारिआ यांनी विजय नोंदवले. माजी विम्बल्डन विजेती अँजलिक कर्बर आणि पाचव्या मानांकित मारिआ सक्कारीचे महिला एकेरीचे आव्हान मात्र तिसऱ्या फेरीतच संपुष्टात आले.

पुरुष एकेरीत जोकोव्हिचने सर्बियाच्याच मिओमिर केचमानोव्हिचला ६-०, ६-३, ६-४ असे सरळ सेटमध्ये नमवले. सामन्याच्या सुरुवातीपासून जोकोव्हिचने प्रतिस्पर्धी खेळा-डूस पुनरागमनाची कोणतीच संधी दिली नाही. अमेरिकेच्या पॉलने चेक प्रजासत्ताकच्या जिरी वेस्लेला ६-३, ६-२, ६-२ असे पराभूत



केले, तर बेल्जियमच्या गॉफिनने फ्रान्सच्या उगो हम्बर्टला चुरशीच्या लढतीत ४-६, ७-५, ६-२, ७-५ असे नामोहरम केले.

महिलांमध्ये तिसऱ्या मानांकित ट्युनिशियाच्या ओन्स जाबेऊरने फ्रान्सच्या डिआने पॅरीवर ६-२, ६-३ असा विजय मिळवत पुढची फेरी गाठली. बेल्जियमच्या मेर्टेन्सने कर्बरवर ६-४, ७-५ असा विजय साकारला, तर जर्मनीच्या मारियाने सक्कारीला ६-३, ७-५ असे हरवून आश्चर्यकारक निकाल नोंदविला.

दरम्यान, भारताची सानिया मिर्झा आणि क्रोएशियाचा साथीदार मॅट पॅव्हिच जोडी-ने मिश्र दुहेरीच्या पहिल्या फेरीत स्पेनच्या डेव्हिड वेगा हर्नांडेझ आणि जॉर्जियाच्या नटेला झाल्मीड्झे जोडीला ६-४, ३-६, ७-६ (३) असे पराभूत करीत दुसरी फेरी गाठली, तर दुसरीकडे भारताचा रामकुमार रामनाथन आणि त्याचा बोस्निया व हर्झेगोव्हिनाचा साथीदार टोमिस्लाव्ह बर्किच जोडीने पुरुष दुहेरीच्या पहिल्या फेरीतच अमेरिकेच्या निकोलस मो-नरोए व टॉमी पॉल जोडीकडून ३-६, ६-७ (५), ६-७ (५) असा पराभव पत्करला.

# महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद बरखास्त

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय कुस्ती संघटनेने मोठा निर्णय घेत महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद बरखास्त केली आहे. महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेविरोधात संदीप भोंडवे यांनी याबाबत तक्रार केली होती.

खासगी कंपनीसोबत महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा करारनामा करुन तो लपवणे, सभासदांना अंधारात ठेवत शासनाकडून ४२ लाख १८ हजार अनुदान घेणे, कुमार, युवा स्पर्धांच्या आयोजकत्वाची जबाबदारी न घेणे, नोटीस न देतापुणेजिल्हा व शगर राष्ट्रीय तालीम संघाची संलग्नता रद्द करणे, संबंधित प्रकरणात भारतीय महासंघाकडून आलेला आदेश डावलणे, वार्षिक सर्वसाधारण सभेत गोंधळणे, सभा स्थगित




झाल्याचे भासवणे, बखोटे प्रोसिडिंग लिहून सर्व विषयांना मंजूर दाखवणे, पैलवानांना आर्थिकदृष्ट्या फायदेशीर स्पर्धा बंद करणे असे आरोप महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेविरोधात लावण्यात आले आहेत.

महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद बरखास्त करण्याच्या निर्णयानंतर तक्रारदार संदीप भोंडवे यांच्याशी संपर्क साधला. या वेळी त्यांनी विविध मुद्दे मांडले. यामध्ये राजकारण आणले जात आहे. शरद पवारसाहेब यांच्यावर आमचा अजिबात आक्षेप नाही, मात्र मागील अनेक दिवसांपासून शरद पवार यांचे नाव वापरून कुठेतरी बाळासाहेब लांडगे कुस्तीत भ्रष्टाचार करीत होते, असा आरोप भोंडवे यांनी केला आहे. ज्या वेळी एखाद्या खेळाला एखादी कंपनी प्रायोजक असते त्या वेळी त्या स्पर्धेचा खर्च ती कंपनी करीत असते, मात्र लांडगे यांनी राज्य कुस्तीगिर परिषदेला अंधारात ठेवून ४२ लाख रुपये महाराष्ट्र शासनाकडून स्पर्धेला अनुदान म्हणून घेतले. आमचा आक्षेप असा होता की कंपनीला प्रायोजक दिले असताना शासनाकडून पैसे घेण्याचे कारण काय, असेही भोंडवे या वेळी म्हणाले.

## खलीने शिकवला कुस्तीपटूला धडा; व्हिडीओ व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रसिद्ध कुस्तीपटू द ग्रेट खली उर्फ दलीप सिंग राणाला सर्वच ओळखतात. डब्ल्यूडब्ल्यूईमध्ये अनेक खेळाडूंना धूळ चारल्यानंतर ते जगभरात प्रसिद्ध झाला. सध्या तो रिंगमध्ये क्वचितच दिसतो, परंतु तो सोशल मीडियावर बरेच सक्रिय असतात. सध्या त्याने एक नवा व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यात तो एका कुस्तीपटूला धडा शिकवताना दिसत आहेत.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या व्हिडीओमध्ये एक कुस्तीपटू द ग्रेट खली उर्फ दलीप सिंग राणाला कबड्डी खेळण्याचे आव्हान देत आहे. खलीला त्याच्या कृत्याचा राग येतो. तो खलीला पकडायला जाताच खली त्याचे डोके पकडतो. आपल्या अनोख्या चालीसाठी प्रसिद्ध असलेले खली कुस्तीपटूचे डोके फुटबॉलप्रमाणे दाबू लागतो. यानंतर पैलवान आरडाओरडा करीत स्वतःची सुटका करून घेण्यासाठी धडपडू लागतो.

खलीने ज्या पद्धतीने त्या माणसाचे डोके धरले आहे ते पाहता ते या कुस्तीपटूला पूर्णपणे धडा शिकवण्याच्या मनस्थितीत असल्याचे दिसत आहे. अखेर दोघांची ही झुंज सोडवण्यासाठी बाकीच्या पैलवानांनाही यावे लागले. खलीने त्याच्या अकादमीतून असा व्हिडीओ शेअर करण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही तो असे करीत आला आहे. या व्हिडीओला हजारो व्ह्यूज मिळाले आहेत.






# इंग्रजांच्या भूमीवर सर जडेजाची शानदार कामगिरी



## तलवारबाजी स्टाईलमध्ये सेलिब्रेशन

**लंडन : वृत्तसंस्था**

भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने इंग्लंडविरुद्धच्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी शानदार शतक झळकावून इतिहास रचला. जडेजाने १८३ चेंडूत १३ चौकारांच्या मदतीने आपले शतक पूर्ण केले. त्याचे हे कसोटी कारकिर्दीतील तिसरे आणि परदेशी भूमीवरील पहिले शतक ठरले आहे.

यापूर्वी जडेजाने २०१८मध्ये राजकोटमध्ये विंडीजविरुद्ध आणि मार्च २०२२मध्ये मोहालीत श्रीलंकेविरुद्ध कसोटी शतक झळकाविले होते. या शतकाबरोबरच जडेजाने इंग्लंडमध्ये ५०० कसोटी धावा पूर्ण केल्या आहेत. इंग्लंडमधील ११ कसोटी सामन्यांमध्ये जडेजाने ३०पेक्षा जास्त सरासरीने ही कामगिरी केली आहे. यापूर्वी इंग्लंडमध्ये त्याची सर्वोच्च धावसंख्या ८६ होती.

जडेजाने शतक पूर्ण करताच या सामन्यात भारतीय संघाच्या नावावर एक अनोखी कामगिरीची नोंद झाली आहे. भारताकडून एकाच कसोटी डावात दोन डावखुऱ्या फलंदाजांनी शतके ठोकण्याची ही तिसरी वेळ आहे. या सामन्यात जडेजाच्या आधी डावखुऱ्या ऋषभ पंतनेही शतक झळकाविले होते.

९२ धावांवर असताना जडेजाचा दुसऱ्या स्लिपमध्ये झेल सुटला अन् तो चेंडू चौकार गेला. त्यानंतर आणखी एक चौकार मारून त्याने शतक पूर्ण केले. इंग्लंडमध्ये शतक ठोकताच जडेजाने आपल्या जुन्याच स्टाईलमध्ये कंबरेतून तलवारीसारखी बॅट बाहेर काढून मैदानावर राजपूताना स्टाईलमध्ये तलवारबाजी करीत शतक साजरे केले.






हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., ॲट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, ॲस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✻ E-mail : ramprahar@gmail.com ✻ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**